"स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाचा विकास : इ. स. १९४७ ते इ. स. २००२"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
मानव्य विद्याशाखेंतर्गत इतिहास विषयातील (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा

अंतिम सारांश

संशोधक

परदेशी इनायत रणजीत

मार्गदर्शक
डॉ. उमेश बगाडे
प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

ऑक्टोबर - २०१९

स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाचा विकास :
इ. स. १९४७ ते इ. स. २००२

प्रस्तावना :

स्वातंत्र्योत्तर भारतात जमातवादाला नवे अर्थ प्राप्त झाले. भारताची फाळणी आणि पाकिस्तानच्या निर्मितीनंतर हिंदू-मुस्लिम जमातवाद संपला, असे काही राजकीय अभ्यासकांचे मत होते. मात्र, स्वातंत्र्यानंतरही हिंदू-मुस्लिम-शिख असे भारतातील जमातवादाचे राजकीय समीकरण कायम राहिले. त्याला जात-वर्ग-लिंगभावाची पार्श्वभूमी होती. तसेच मानसिक पैलूही होते. शास्त्रीय परिभाषेनुसार स्वातंत्र्यानंतर भारतातील जमातवादाचा 'विकास' झाला. हा विकास जमातवादाच्या संदर्भात मूल्यात्मक बदल घडवणारा होता. जमातवादाचे स्वरूप बदलून त्याचा आवाका मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांत विस्तृत झाला. स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या अभ्यासाचे ह्या शोधशोधप्रबंधात टप्पे केलेले आहेत. ह्या शोध शोधप्रबंधात जातवादाचा धार्मिक संघर्षाच्या संदर्भात अभ्यास केला जाणार आहे. तसेच जमातवादाची जातवर्गीय पार्श्वभूमी अभ्यासली जाणार आहे. जमातवादामागील लिंगभावात्मक पैलूंचाही परामर्श ह्या शोधशोधप्रबंधात घेतला जाईल. जमातवाद, त्याची जात-वर्ग-लिंगभावात्मक चिकित्सा करणे, त्याचे राजकीय-सामाजिक-आर्थिक परिणाम यांचा सूत्रबध्द आढावा घेणे, हे उद्दिष्ट या शोधप्रबंधाचे आहे. तसेच जमातवादामागील मानसशास्त्रीय कारणांचाही अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात केला जाईल. जमातीय दंगली व त्यांचे बदलत जाणारे स्वरूप, ह्या स्वरूपाची जातवर्गलिंगभावलक्षी चिकित्सा ह्या शोधप्रबंधात करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

संशोधन समस्या :

जमातवादाचा अभ्यास विविध अभ्यासकांनी केलेला असून त्यांनी मार्क्सवादी, लिंगभावलक्षी, उदारमतवादी, गांधीवादी पध्दतींतून जमातवाद अभ्यासला आहे. परंतु जात-वर्ग-लिंगभाव ह्या तिन्हींच्या एकत्रित लागुकरणातून भारतातील जमातवादाचा अभ्यास झालेला नाही. जात-वर्ग-पितृसत्ता ह्या संस्थांचे एकत्रित वास्तव्य आणि जात-पितृसत्तेचा पगडा हे भारतीय उपखंडातील समाजव्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. भारतीय उपखंडातील जमातवादाचे शक्तीस्रोत

जात-पितृसत्ता हे घटक असून त्यांच्या अनुषंगाने जमातवादाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यासाठी जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषणपध्दतीचे लागुकरण महत्वपूर्ण आहे. मार्क्सवादी अभ्यासप्रवाहाने केवळ वर्ग ह्या घटकास आधारभूत मानून स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवाद अभ्यासला. तर स्त्रीवादी प्रवाहाने केवळ लिंगभाव हा लक्ष्यकेंद्रीय मुद्दा स्वातंत्र्योत्तर भारताच्या जमातवादाच्या अभ्यासासंदर्भात ठेवला. जातिअंतक प्रवाहाने केवळ धार्मिक संघर्षास अभ्यासविषय मानले. मात्र, स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय-सामाजिक वास्तव हे बहुआयामी आहे. त्यामुळेच जमातवादालाही जात-वर्ग-लिंगभाव यांचे एकत्रित आयाम आहेत. म्हणून स्वातंत्र्योत्तर भारतातील जामतवादाचा जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषणपध्दतीतून अभ्यास होणे गरजेचे ठरते. ह्या अभ्यासाचा प्रयत्न हा शोधप्रबंध करतो.

संशोधनाचा पूर्वआढावा (Review of Literature) :

भारतातील जमातवादाच्या संदर्भात यापूर्वी काही अभ्यासकांनी संशोधन केलेले आहे. मात्र, ही संशोधने केवळ राजकीय आणि सांस्कृतिक पैलूंवर भर देणारी आहेत. प्रस्तुत शोधशोधप्रबंधातील संशोधन हे ऐतिहासिक समाजशास्त्र, राजकीय अर्थशास्त्र यांवर आधारित असून जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषणपध्दती त्याच्या अभ्यासाचे मुख्य सूत्र आहे. त्याच्या जोडीला जमातवादाच्या मानसिकतेच्या अभ्यासाची दखल घेतलेली आहे.

जमातवादाचे अभ्यासक प्रियवदन पटेल हे त्यांच्या 'Recent History and Politics of Communalism and Communal Riots in Gujrat' ह्या लेखात गुजरात राज्यातील अहमदाबाद शहरातील जमातीय दंगलींवर भाष्य करतात. 'Communalism in India' ह्या पुस्तकात हा लेख आहे. ह्या लेखात ते इ.स. १९६९ च्या गुजरात दंगलीतील राजकीय कारणांचे विश्लेषण देतात. ह्याच पुस्तकात घनश्याम शहा यांचा 'The Communal Riots of Ahmedabad : A Case Study' हा लेख आहे. हा लेख अहमदाबाद शहरातील जमातीय दंगल व तिच्या सांस्कृतिक - राजकीय कारणांचे स्पष्टीकरण करतो. ह्या लेखांची मर्यादा म्हणजे, हे लेख राजकीय व हिंसक घटनांच्या विश्लेषणापुरतेच मर्यादित राहतात. जातवर्गीयलिंगभावलक्षी विश्लेषण ते देत नाहीत. कारण, ह्या लेखांचा अभ्यासविषय हा राजकीय घटनाक्रम व जमातीय हिंसेची दाहकता दाखविणे हा आहे.

रजनी कोठारी हे राजकीय अभ्यासक त्यांच्या 'The Pilitics and the People' ह्या ग्रंथाच्या दोन भागांमध्ये भारतातील जमातवादाचे राजकीय समाजशास्त्र उलगडतात. स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाची कारणमिमांसा देतांना ते शासनसंस्था, विपक्ष, त्यांचे जमातवादविषयक धोरण यांची मांडणी करतात. तसेच जातीआधारित भारतीय समाजाचा काही अंशी विचार करतात. मात्र, जात, त्यावर आधारित वर्गनिर्मिती, तिचा जमातवादाशी असलेला संबंध यांचा व्यापक विचार त्याच्या लेखनात नाही. कारण, त्यांचा मुख्य भर हा शासन-विपक्ष यांचे धोरण यांवर आहे.

पॉल ब्रास हे जमातवादाचे अभ्यासक स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाचा भाषा आणि धर्माच्या अंगाने विचार करतात. त्यांच्या अभ्यासविषयाची व्याप्ती उत्तर भारत ही आहे. त्यांनी भारतातील जमातवादाच्या संदर्भात 'The Language, Religion and Politics in North India', 'Producton of Hindu-Muslim Violence in Contemporary India' हे ग्रंथ लिहिले आहेत. त्यात जातीचा मुद्दा मर्यादित प्रमाणात असला तरी, भाषा व त्याआधारे होणारे धर्मांध - जमातीय राजकरण यांची चर्चा केलेली आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात ह्या ग्रंथांचा संदर्भ म्हणून वापर केलेला आहे.

राम पुनियानी हे जमातवादाचे अभ्यासक भारतातील जमातवाद आणि त्याच्या उदय - विकासावर प्रबोधनात्मक भाष्य करतात. त्यांनी 'भारतातील जमातवाद - मिथक आणि वास्तव', 'धर्मवादाचे राजकारण', 'आंतकवाद कैसे समझे?' इ. ग्रंथ लिहिलेले आहेत. त्यात ते जमातवाद व त्यामागील क्रिया-प्रतिक्रिया, जमातवादाची व जमातीय हिंसेची तर्कसंगती यांचा आढावा घेतात. त्यांनी 'Caste and Communalism' हे पुस्तकदेखील लिहिलेले आहे. त्यांची विश्लेषणपध्दती ही उच्चजातवर्गीय-अभिजनवादी राजकारणाशी संबंधित नसून जातीआधारित शोषणाचा आढावा घेणारी आहे. प्रस्तुत शोधप्रबंध 'भारतातील जमातवाद व त्याचा शक्तीस्त्रोत जात हा आहे आणि जातीआधारेच झालेल्या वर्गनिर्मितीमुळे जमातवादाचा विकास होत आहे' अशी मांडणी करतो.

वॉर्ड बेरेनशॉट (Ward Berenschot) हा लेखक जमातीय दंगलीची राजकीय-सांस्कृतिक कारणमिमांसा देतो. त्याचा अभ्यासविषय हा राजकारण व सांस्कृतिक घटनाक्रमापुरता सीमीत असून जात हा घटक त्यात दुर्लक्षित आहे.

असघर अली इंजिनिअर, मोईन शाकीर यांनी भारतातील जमातवादाविषयी अनेक पुस्तके व लेखांतून मांडणी केलेली आहे. त्यांची गाजलेली पुस्तके म्हणजे 'Communal Riots in Independent India', 'Communalism in India' इ. होय. त्यांच्या मांडणीचा आधार हा उदारमतवाद, धर्मनिरपेक्षता आणि राजकीय घटनाक्रम हा राहिलेला आहे. जातवर्गलिंगभावलक्षी अन्वेषणपध्दतीतून त्यांची मांडणी नाही. मात्र, राजकीय घटनाक्रम आणि आकडेवारीच्या दृष्टीने त्यांच्या पुस्तकांचा व लेखांचा संदर्भ प्रस्तुत शोधप्रबंधात घेतला आहे.

सुधीर कक्कर हे अभ्यासक भारतातील जमातवादाचा मानसशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करतात. त्यांच्या विश्लेषणात जमात, स्त्रीविषयक जमातीय दृष्टीकोन, झुंडीचे मानसशास्त्र, जमातीय तणावाचे मानसशास्त्र ह्या संकल्पनांची मांडणी येते. ह्या संकल्पनांचा वापर प्रस्तुत शोधप्रबंधात जात, लिंगभाव, अभिजनवादी राजकारण, स्त्रीप्रश्न इ. संदर्भात लागूकरण करून केलेला आहे. मात्र, भारतातील स्वअस्मिता, स्वसमूहभान यांची निर्मिती जात-पितृसत्ता ह्या घटकांआधारे होते. याचे विवेचन कक्कर त्यांच्या 'द कलर्स ऑफ व्हॉयोलन्स' या पुस्तकात देत नाहीत. ते देण्यासाठी जमातीय तणावाच्या कालखंडातील जातीविग्रहांचे विलोपन आणि अखिल धार्मिक अस्मिता-ऐक्य यांची निर्मिती हा ह्या शोधप्रबंधाचा महत्वपूर्ण मुद्दा म्हणून मांडला आहे.

ख्रिस्तोफे जाफरलॉट हे जमातवादाचे अभ्यासक भारतातील जमातवादाची राजकारण, धर्म व जातीआधारित मांडणी करतात. मात्र, त्यांच्या अभ्यासाविषयाची व्याप्ती हि प्रामुख्याने १९९० च्या दशकाभोवती आहे. त्यांच्या 'Caste, Religion and Communalism in India' ह्या ग्रंथाचा संदर्भ प्रस्तुत शोधप्रबंधात चौथ्या व पाचव्या प्रकरणात घेतला आहे.

वर उल्लेखित सर्व अभ्यासक जमातवादाकडे एका विशिष्ट अन्वेषणपध्दतीतून बघतात. त्यांची अन्वेषणपध्दत बहुआयामी नाही. त्यामुळे ह्या अभ्यासकांच्या स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या संशोधनास मर्यादा प्राप्त होतात. भारतातील जमातवादाचा आंतरिक शक्तीस्रोत हा जात-वर्ग-पितृसत्ता आहे. त्यामुळेच जमातवादाच्या अभ्यासासाठी जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषणध्दतीची आवश्यकता आहे. ही आवश्यकता पूर्ण करण्याचे उद्दिष्ट हा शोधप्रबंध ठेवतो.

संशोधनपद्धती : जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषणपध्दती

ह्या अन्वेषणपद्धतीची मांडणी इतिहासकार, प्राच्यविद्यापंडीत शरद् पाटील यांनी केली. जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषण पध्दतीनुसार 'हिंदुस्तान हा हिंदू व मुसलमान हे मुख्य धर्म असलेला देश आहे आणि त्याशिवाय त्यांत इतर धार्मिक अल्पसंख्यांक असून खुद्द हिंदूंमधल्या

अनेक जातीही आहेत. या विविध धर्म आणि जातींमधून जो भांडवलदार वर्ग उदयाला आला, तो त्याच्या धर्मांच्या आणि जातींच्या लक्षणांनी युक्त होता. म्हणून, जरी भांडवली विकासात त्यांचे एकसारखे व समान हितसंबंध असले, तरी या वेगवेगळ्या भांडवली विभागांना आपापल्या धर्माच्या व जातींच्या हितसंबंधाचे रक्षण करावे लागते. 'धर्मजातीय समस्ये' मागची ही वस्तुस्थिती भांडवलदारी राष्ट्रवाद्यांना समजत नाही. म्हणजे, हिंदी भांडवलदार वर्ग ही अमूर्त संकल्पना होती, तर हिंदू भांडवलदारवर्ग, मुसलमान भांडवलदारवर्ग, जातजमातीय भांडवलदारवर्ग या ठोस संकल्पना होत्या. वस्तुस्थिती होत्या.' असे शरद् पाटील 'स्वातंत्र्यलढ्याचे कर्मठ व ब्राह्मणी मार्क्सवादी विश्लेषण करणारा नंबुद्रीपादांचा ग्रंथ'या लेखात म्हणतात.

ह्या लेखात शरद् पाटील पुढे प्रतिपादन करतात की, 'हिंदू भांडवलदारवर्ग ही संकल्पना वा वस्तुस्थिती मान्य केल्यानंतर काँग्रेस ही हिंदूंची राजकीय संस्था होती, हे मान्य करणे भाग पडते. हिंदू भांडवलदारवर्गाला ज्याप्रमाणे तो बहुसंख्यांकांचा वरिष्ठ वर्ग असल्यामुळे त्याचे शोषणशासनाचे हितसंबंध निधर्मी राष्ट्राचे वा राष्ट्रवादाचे असल्याचे दाखवता आले. त्याच प्रमाणे मुसलमान भांडवलदार वर्गाला तो अल्पसंख्यांकांचा वरिष्ठ वर्ग असल्यामुळे त्याचे शोषणशासनाचे हितसंबंध धार्मिक वा राष्ट्रवादाचे दाखवावे लागले.'

जातवर्गव्यवस्था आणि जमातवाद या संदर्भात शरद पाटील असे प्रतिपादन करतात की, "धर्म हा असमानतेची व्यवस्था म्हणून कधीच जन्माला आला नाही. शोषणपूर्व गण वा तत्सम समाजांमध्ये स्त्री व पुरुष, वय वा नात्याने ज्येष्ठ व कनिष्ठ या असमानता होत्या. तसेच धर्म हा शोषणव्यवस्था म्हणूनही जन्माला आला नाही. आधी शोषणाधिष्ठित वर्णव्यवस्था जन्माला आली आणि नंतर तिचा श्रौत धर्म. त्यानंतर आधी शोषणाधिष्ठित जातीव्यवस्था जन्माला आली आणि नंतर तिचा स्मार्त धर्म. म्हणून धर्म हा शोषणव्यवस्था नाही, शोषणव्यवस्थेच्या समर्थनाचे वैचारिक साधन आहे. म्हणून मार्क्सवाद धर्माला समाजवास्तूच्या पायात नाही, तर वैचारिक इमाल्याच्या दर्शनी हॉलचे स्थान देतो. ज्याप्रमाणे बहुसंख्यांकांचा हिंदू भांडवलदारवर्ग राष्ट्रातले धर्मजातजमातवर्गभेद विसरायला लावून त्यांच्या धर्मातील जनतेला एकत्र आणतो, त्याचप्रमाणे धार्मिक अल्पसंख्यांकांचे भांडवलदारवर्ग त्यांच्या धर्मातील जनतेला जातजमातवर्गभेद विसरायला लावून एकत्र आणतात. शीखधर्मीय भांडवलदार वर्गाच्या आक्रमक विभागाने 'खलिस्तान'च्या घोषणेद्वारे तेच चालवले आहे; शीख अस्पृश्यांनाही त्याने हिंदूंविरुद्ध उभे केले आहे.'

बाबरीविध्वंसानंतर जातीव्यवस्था, जमातवाद आणि इतिहास यांचा प्रश्न सातत्याने अभ्यासकांनी चर्चिला आहे. त्यावरील चर्चेतून हे लक्षात येते की, धर्मनिरपेक्ष म्हणविणाऱ्या आणि डाव्या शक्तींनाही सांस्कृतिक-धार्मिक प्रबोधनाकडे दुर्लक्ष केलेले आहे. याबाबत सकारात्मक प्रबोधनाऐवजी लोकप्रिय राजकीय पवित्रा काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष शक्तींनी घेतला. याबाबत शरद् पाटील पुरावे देतात- 'धर्मवेड्या संघटनांवर बंदीचे सर्व भाजपेतर पक्ष व संघटनांनी समर्थन केले आणि हा उपाय नकारात्मक असल्याचे म्हटले, तरी प्रबोधन म्हणजे धर्मनिरपेक्षता, घटना, लोकशाही. न्यायसंस्था इ. च्या आधारावर हिंदुत्ववादी पक्षसंघटनांचा निषेध जनमानसावर बिंबवणे एवढेच मानले जात आहे. पण, हे प्रबोधन अपुरे आहे. हे कोणीही विचारी माणूस अमान्य करणार नाही. आणि हे प्रबोधन प्रतिइतिहास निश्चितच नाही. भाजपची शक्ती त्याला निवडाणुकांत मिळणाऱ्या एकूण मतदानावर ठरत नाही. भाजपाला मतदान न करणारे ९९ टक्के हिंदू रामाला मानतात. आर्थिक लढ्याने सर्व प्रश्न, प्रबोधनाचाही सुटतात, असा शरद जोशींचा व त्या अगोदर पारंपरिक कम्युनिस्ट पक्षांचा सिद्धांत आहे. पण, पुराणातल्या रामाने त्यांचा शेतकरी लढा बुडवला, हे ते अमान्य करू शकणार नाहीत. विदर्भातील एका शेतकरी परिषदेत जोशींनी सीतामंदीर बांधायचे आवाहन केले. जणू काय देशात रामसीतेची मंदिरे नाहीत आणि रामभक्त 'सिया-रामचंद्र कि जय' अशी घोषणा देत नाहीत. आणि रामपत्नी सीता-तिच्यावर रामाने कितीही अन्याय, अत्याचार केलेले असले, तरी प्रतिइतिहासाची जागा घेऊ शकत नाही. ताटका, शूर्पणखा, शंबूक यांची मंदिरे बांधणे हा प्रतिइतिहास होऊ शकतो. अशा प्रतिइतिहासाचा 'आदेश' जेव्हा ते आपल्या शेतकरी अनुयायांना देतील, तेव्हाच ते फुलेंचे खरे वारसदार होऊ शकतील. फुलेशिष्य शरद पवारांनी तर नुकतीच- 'मला हिंदू धर्माचा सार्थ अभिमान आहे', अशी धर्मोक्ती केली. भाजप-शिवसेनेने लोक सभा व राज्यसभेत आणलेल्या राव सरकारवरील अविश्वास ठरावाच्या चर्चेत महाभारतातील शस्त्रास्त्रे एकमेकांवर वापरली गेली. अटल बिहारी वाजपेयींनी ब्राह्मणी इतिहास वापरणे स्वाभाविक होते. अर्जुन सिंग व बलराम जाखड यांनीही ब्राह्मणी इतिहास वापरणे स्वभाविक होते. पण, राआ (राष्ट्रवादी आघाडी) आणि डाआ (डावी आघाडी) यांपैकी कोणी तसेही प्रत्युत्तर द्यायचा प्रयत्न केला नाही. पण ते ब्राह्मणी इतिहासाने प्रत्युत्तर देत नाहीत, असे नाही. मुंबईला झालेल्या राखीव जागा समर्थन परिषदेत जनता दलाचे शरद यादव यांनी रामाला शुद्र व स्त्रियांचा वाली म्हणून गौरविले होते. सिंग सरकारवरील अविश्वास ठरावाच्या चर्चेत माकपचे खासदार सोमनाथ चटर्जी यांनी रावण व राक्षस यांना सैतान आणि

साक्षात दुष्टता संबोधून रामाला अप्रत्यक्षपणे गौरविले होतेच. भाकपचे ए.बी. बर्धन यांनी पुण्याला भरलेल्या शेतकरी पंचायतीत 'सुवर्णरथासीन रावण म्हणजे लालकृष्ण अडवाणी आणि विरथ राम म्हणजे व्हि.पी. सिंग' असे शैलीदारपणे म्हणून शरद जोशींच्या समोर शेतकऱ्यांच्या टाळ्या मिळविल्या होत्या', असे शरद् पाटील 'मार्क्सवाद : फुले- आंबेडकरवाद' या ग्रंथात नमुद करतात.

स्वातंत्र्योत्तर भारतात काँग्रेस पक्ष हा सर्वधर्मीय उच्चजातवर्गीय अभिजनांचा पक्ष होता. ह्या अभिजनांचे ऐक्य महत्वाच्या मुद्यांवर किमान सहमती आणि त्या आधारे समावेशन यांवर टिकलेले होते. ह्या पक्षाला 'मवाळ हिंदूत्ववादी' असे संबोधन काही अभ्यासक वापरतात. मात्र, हा पक्ष 'छुपा जमातवादी' होता. कारण, ह्या पक्षाच्या नेतृत्वाने हिंदू कोड बिलासह समान नागरी कायद्याचाही विरोध केला. शाहबानो प्रकरण, बाबरी विध्वंस याबाबत हा पक्ष पक्षपाती राहिला. म्हणजे त्यात फक्त 'हिदू जमातवादधार्जिणे' गुण नसून 'मुस्लिम जमातवादधार्जिणे' गुणही होते. म्हणूनच हिंदू-मुस्लिम व इतर धर्मांतील उच्चजातवर्गीय अभिजनांची संधिसाधू एकजूड असलेला हा पक्ष 'छुपा जमातवादी' ठरतो. जमातवादाशी संबंधित विविध प्रकरणात ह्या पक्षाने उच्चजातवर्गीय अभिजनांचे ऐक्य टिकविण्यासाठी संधिसाधू, मतकेंद्री भूमिका वारंवार घेतल्या. प्रसंगी हिंदू, तर कधी मुस्लिम अभिजनांना खुश करण्यासाठी ह्या पक्षाच्या नेतृत्वाने जमातवादाच्या प्रश्नावर आपली भूमिका वारंवार बदलली. त्यातूनच ह्या पक्षातील उच्चजातवर्गीय अभिजनांची एकजूट कमकुवत होत गेली. त्यातून हे अभिजन उघउ जमातवादाकडे आणि नव्या अतिजहाल जमातवादी पक्षांकडे वळाले.

डाव्या पक्षांनी धर्म, जात, संस्कृती यांवर स्पष्ट भूमिका घेतली नाही. वर्गवाद हा अंतिम मानून भारतीय जमातवादाकडे पहिल्याने ह्या पक्षांचे राजकीय लढे हे कामगार-मजूर इ. पुरतेच मर्यादित राहिले. परिणामी, मंडल, बाबरी याबाबत प्रबोधन त्यांनी केले नाही. जातीअंतक पक्षांची राजकीय भूमिका जात आणि आरक्षण यापुरती सीमीत राहिली. जमातवाद आणि त्यामागील शक्तीस्त्रोत असलेली जातीव्यवस्था आणि पितृसत्ता यांची सम्यक दखल त्यांनी घेतली नाही. परिणामतः संसदीय राजकारणात हे पक्ष प्रारंभी काँग्रेस आणि त्यानंतर जमातवादी पक्षांचे आश्रित म्हणून राहिले.

जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषणपद्धतीचा इतिहाससंधोनात वापर उमा चक्रवर्ती ह्या विदुषींनी केलेला आहे. त्यांचे संशोधन प्रामुख्याने प्राचीन इतिहासाबद्दल आहे. उमा चक्रवर्ती यांनी 'From Myths to Markets', 'Gendering Caste Through the Feminist Lens',

'Rewriting History: from Life and Times of Pandita Ramabai', 'Everyday Lives, Everyday Histories' इ. ग्रंथ लिहिले आहेत. त्यांच्या 'Conceptualising Brahmanical Patriachy in Early India-Gender, Caste, Class and State' ह्या लेखात त्या प्रतिपादन करतात की, 'ब्राह्मणी सामाजिक संरचनेची संघटक तत्वे म्हणजे जातीय उतरंड आणि लैंगिक उतरंड होय. ही संघटक तत्वे निकटतेने परस्परसंबंधी आहेत. जात आणि लिंगभाव यांत संबंध आहे. ही भारतीय समाजरचनेची वैशिष्ट्ये आहेत. हिंदू समाजात उच्चजातीय स्त्रियांवर जातीय शुद्धत्व आणि पितृप्रधान वारसाहक्क संरक्षित ठेवण्यासाठी प्रभावी लैंगिक नियंत्रणे लादली जातात.'

उमा चक्रवर्ती ह्या लेखात पुढे म्हणतात - 'ब्राह्मणी पितृसत्तेच्या निर्मितीत जात, वर्ग लिंगभाव ह्यांवर आधारित स्तरीकरणाचा महत्त्वाचा वाटा आहे. त्या आधारे भारतीय समाजरचना निर्माण झालेली आहे. विशिष्ट कालखंडानंतर भारतीय समाजरचनेने जात, वर्ग आणि लिंगभाव यांच्या व्यामिश्र स्वरूप धारण केले'.

भारतीय समजातील वर्गसंस्थेची निर्मिती ही जात आणि पितृसत्ता ह्या घटकांनी प्रभावित राहिली. त्यामुळे भारतात विशुद्ध असे 'जात' किंवा 'वर्ग' असे समाजरचनेचे स्वरूप नाही. जात आणि पितृसत्ता ह्या संस्थांनी वर्गावर प्रभाव ठेवल्यामुळे भारतीय समाज हा 'जात-वर्ग' समाज आहे. ह्या जात-वर्गीय समाजात राजकीय अभिजन वर्गही हिंदू, मुस्लिम, शीख ह्या धर्मांतील उच्च जातींतून उदयास आले. ह्या उच्चजातवर्गीय अभिजनांनी स्वजात-पितृसत्तासमर्थक राजकारण-अर्थकारण सातत्याने केलेले आहे. ह्या प्रक्रियेने भारतातील जमातवादास प्रभावित केले आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत शोधप्रबंध हा इतिहासाच्या अभ्यासशाखेतील संशोधन आहे. 'स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाचा विकास' हा संशोधनविषय आधुनिक भारताच्या इतिहासाशी संबंधित आहे. 'जमातवाद' हि संकल्पना धर्मासह, वंश, पंथ, भाषा, जात इ. घटकांनी प्रभावित होते. मात्र, भारतासंदर्भात धर्म जात, पितृसत्ता हे मुद्दे महत्त्वाचे ठरतात. अभ्यासविषयाचे नेमके महत्त्व आणि मर्यादा म्हणून 'जमातवाद' ह्या संकल्पनेला धार्मिक संघर्षाच्या संदर्भात हा शोधप्रबंध अभ्यासतो. त्याची कालव्याप्ती इ.स. १९४७ ते इ.स. २००२ एवढी ठेवली आहे. इ.स. १९४७ मधील पाकिस्तानची निर्मिती ते इ.स. २००२ मधील गुजरातमधील जमातीय हिंसाचार ही

संशोधनविषयाची मर्यादा ह्या शोधप्रबंधाला आहे. इ.स. १९४७ ते इ.स. २००२ ह्या कालावधीतील जमातवादाचा विकास, त्याचे बदलते स्वरूप, जमातवादाच्या विकासातील जात-वर्ग-पितृसत्ता यांची महत्त्वाची भूमिका, त्याचे राजकीय-सामाजिक परिणाम यांचा आढावा हा शोधप्रबंध घेतो. ह्या शोधप्रबंधात 'जमातवादाची वाढ' ह्या शब्दप्रयोगाऐवजी 'जमातवादाचा विकास' हा शब्दप्रयोग केलेला आहे. 'विकास ही संज्ञा वाढ, बदलते स्वरूप, अतितीव्र वेगाने वाढणारी जमातवादाची व्याप्ती, त्याचे दीर्घकालीन परिणाम दर्शविते. जमातवाद ही समस्या फक्त भारतापुरतीच मर्यादित नाही. ती भारतीय उपखंड आणि जगाला व्यापणारी समस्या बनली आहे. भारत आणि भारतीय उपखंडाचे समाजवास्तव हे जात-वर्ग-पितृसत्ताक असल्याने येथील जमातवाद जात-वर्ग पितृसत्ता ह्या शक्तींच्या आधारे कार्यरत राहतो. म्हणूनच जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषणपद्धतीची आवश्यकता अधोरेखीत होते.

संशोधनाचे महत्त्व आणि आवश्यकता :

स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या विकसाचा ऐतिहासिक आढावा घेणे, हे ह्या शोधप्रबंधाचे महत्त्व ठरते. भारतातील सामाजिक संघर्ष हा जातीभोवती उभा राहिलेला आहे. त्याचबरोबर प्राचीन भारतीय समाजात वर्ण व त्यानंतरच्या काळात जातीव्यवस्था ही उत्पादनव्यवस्थेची निर्धारक शक्ती राहिलेली आहे. ह्या सूत्रानुसार प्राचीन भारतातील धर्म, संस्कृती, तत्वज्ञान, साहित्य, राजकीय विचारप्रणाली यांतील संघर्ष हे जातीआधारित राहिलेले आहेत. काही अभ्यासकांच्या मते, पारंपरिक मार्क्सवादी व सर्वधर्मसमभाववादी प्रवाहांनी जातीच्या मध्यवर्ती स्थानाची दखल न घेतल्यामळे ह्या क्षेत्रातील प्रबोधनापासून धर्मनिरपेक्ष शक्ती दूर राहिल्या. हे लक्षात घेता हा शोधप्रबंध जातवर्गलिंगभावलक्षी अन्वेषणपद्धतीचा वापर करतो. मध्ययुगीन व आधुनिक भारतातील जातीसंघर्षाचे मुख्य समाजवास्तव लक्षात घेतल्याविना जमातवाद, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, उदारमतवाद, सांस्कृतिक राष्ट्रवाद इ. चे स्वरूप आणि अभिजनांतील राजकीय-सामाजिक संघर्ष यांचे विश्लेषण होणे अशक्य आहे.

वर्गवादी अन्वेषणपद्धती वर्गाला समाजवास्तूचा पाया मानते. तसेच ह्या वर्गीय उत्पादनसंबंधांनुसार धर्म, इतिहास, तत्वज्ञान, संस्कृती, राजकीय विचारप्रणाली, राष्ट्रवाद, जमातवाद यांची घडण होते, असे मानते. प्रस्तुत शोधप्रबंध इतर अन्वेषणपद्धतींच्या सोबतीला

वर्गवादी अन्वेषणपद्धतीचाही स्वीकार करतो. ही पद्धती वर्गीय अंगाने जमातवाद, त्याचे सत्ताकारण, विचारप्रणाली, जमातवादी अभिजन वर्गातील संघर्ष व समझौते यांचा वेध घेते.

स्त्रीवादी अन्वेषणपद्धतीचा विकास झाल्यानंतर जात, जमात, राष्ट्र-राष्ट्रवाद, धर्म, संस्कृती, इतिहास, साहित्य ह्या सर्वच क्षेत्रांमध्ये लिंगभावाच्या सिद्धांताचा आधार घेण्यात येत आहे. स्त्रीवादी अन्वेषणपद्धतीमुळे इतिहासलेखनशास्त्राचाही विकास होत आहे. हे लक्षात घेऊन जमातवाद, त्याचा विकास, धर्म-संस्कृती व राष्ट्रवादाच्या विचारप्रणालीचे राजकारण ह्या क्षेत्रांतही स्त्री-प्रश्नांची, त्यांच्या जमातवादाशी असलेल्या संबंधांची दखल हा शोधप्रबंध घेतो. जमातवादी राजकारण, राष्ट्रवादी चळवळ, समान नागरी कायदा, पितृसत्ताक धर्मकारण यांचा अभ्यास ह्या शोधप्रबंधात करण्यात आलेला आहे.

जातलक्षी अन्वेषण, वर्गलक्षी अन्वेषण आणि लिंभभावलक्षी अन्वेषण ह्या तिन्हींच्या समन्वित लागूकरणातून हा शोधप्रबंध वास्तवाचा शोध घेतो. इतिहासाची विश्लेषणपद्धती, राजकीय समाजशास्त्र, स्त्रीवादी सिद्धांत यांचे योग्य असे लागूकरण विषयाच्या आकलनासाठी ह्या शोधप्रबंधात केलेले आहे. जमातवादासारख्या सर्व क्षेत्रांना व्यापणाऱ्या समस्येचे ऐतिहासिक आकलन महत्त्वाचे आहे. मात्र, जमातवादाचे वास्तव हे एकांगी निश्चितच नाही. ते जात-वर्ग-पितृसत्ता यांच्या आधारे विकासमान आहे. म्हणूनच हा शोधप्रबंध जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषणपद्धतीच्या आधारे जमातवादाच्या समस्येचे संशोधन करू पाहतो.

गृहीतके (Hypothesis) :

१. भारतातील जमातवादाचे वर्गवादी अभ्यासक हे जमातवादाच्या उदय-विकासामागील कारणमिमांसा जरी समाजातील वर्गीयशक्तीपुरती सीमित करीत असले, तरी भारतीय जमातवादाचा आंतरिक शक्तीस्त्रोत जातीव्यवस्था हा आहे. आर्थिक-राजकीय-सामाजिक विकासाच्या संदर्भात जमातवादाचे बदलते स्वरूप स्पष्ट होत असते.

२. हिंदू जमातवाद, मुस्लिम जमातवाद, शीख जमातवाद यांच्या उदय-विकासामागे दर्शनी कारण जरी परधर्मद्वेष हे असले, तरी आर्थिक हितसंबंधांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. भारतीय जमातवादाच्या ऐतिहासिक आढाव्यातून हे वास्तव पुढे येते.

३. आपापल्या जमातीतील पितृसत्ताक संबंधांच्या व विचारप्रणालीच्या संवर्धन-संपोषणासाठी जमातवादी विचारप्रणाली आणि जमातवादी राजकारण यांचा वापर

जमातवादी शक्ती करत असतात. त्यांच्या पितृसत्ताक राजकारणाचा वेध घेणे म्हणूनच गरजेचे ठरते.

४. परधर्मद्‌वेषाचे राजकारण हे जमातवादाचे बाह्य आवरण राहिलेले आहे. पदधर्मद्‌वेषाचे राजकारण करण्यासाठी सामुहिक स्मृतींचा विपर्यस्त वापर जमातवादी शक्तींनी केला. त्याचा सम्यक प्रतिकार धर्मनिरपेक्षतावादी शक्ती पर्यायी इतिहासलेखनाअभावी करू शकल्या नाहीत. उदा. रामजन्मभूमी आंदोलन किंवा गोब्राह्मणप्रतिपालक शिवाजी यांसारख्या प्रतिकांसंदर्भात सम्यक, समर्थ प्रतिके उभी केली गेली नाहीत. खोटा इतिहास, परधर्मविषयक मिथके, गैरसमज यांतून परधर्मरूपी आभासी शत्रू उभा करणे जमातवादी शक्तींसाठी त्यामुळे सोपे बनते. विपर्यस्त इतिहालेखनाआधारे 'सामुहीक आघात' अथवा 'सामुहीक गौरव' यांच्या स्मृती जनमानसिकतेवर जमातीय परिणाम साधतात. परजमातीय आभासी शत्रूला विपर्यस्त इतिहासलेखन आणि त्याआधारे तयार झालेल्या 'सामुहीक आघात' अथवा 'सामुहीक गौरव' याच्या स्मृती यांद्‌वारे उभे करणे जमातवादी शक्तींसाठी सोपे बनते.

५. धर्म आणि संस्कृतीचा वापर आपल्या अधिनेतृत्वाला बळकटी देण्यासाठी जमातवादी शक्तींनी केला. विशिष्ट राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीमध्ये धर्म आणि संस्कृती यांच्या क्षेत्रांत पर्यायी प्रबोधन धर्मनिरपेक्षतावादी शक्तींनी उभे केले नाही. परिणामी, ह्या क्षेत्रांतील विचारसंघर्षांत धार्मिक व सांस्कृतिक अभिजनांनी आपले अधिनेतृत्व राखण्यात यश मिळविले. धर्म आणि संस्कृती यांच्या संदर्भातील वर्गजातीस्त्रीदास्यविरोधक विश्लेषणपद्धतीची म्हणूनच आवश्यकता आहे. एकांगी धर्मविरोधी दृष्टिकोनामुळे भक्ती चळवळ आणि अब्राह्मणी धर्मचळवळी यांचा विद्रोह धर्मनिरपेक्ष व वर्गवादी शक्तींनी मांडला नाही.

६. भारतीय उपखंडातील समाज हा जातीव्यवस्थेद्वारे विभाजित समाज आहे. परंतु जमातीय तणाव आणि संघर्षाच्या कालखंडात हिंदू, मुस्लिम, शीख आणि इतर धर्मांतील उच्चजातवर्गीय अभिजन हे ह्या जातीय विभाजनाचा-जातीय विग्रहांचा तात्पुरता विसर पाडण्याची प्रक्रिया जमातीय तणावाच्या कालखंडात घडवतात. निम्न व मध्यम जातवर्गीय विभाजित घटक तात्पुरते धर्मासाठी एकत्र येतात. हे ऐक्य आभासी शत्रू असलेल्या परधर्मीय जमातीविरूद्ध असते.

७. जमातीय तणाव आणि संघषाचे मुख्य उद्दिष्ट जमातीय ऐक्य हे नसून सामाजिक-राजकीय-आर्थिक लाभ हे असते. यासाठी जमातीय ध्रुवीकरण घडविले जाते. हे ध्रुवीकरण घडविण्यात उच्चजातवर्गीय अभिजन नेतृत्वस्थानी असतात.

उद्दिष्ट्ये :

१. स्वातंत्र्योत्तर जमातवादाचे स्वरूप समजवून घेणे, हे ह्या शोधशोधप्रबंधाचे प्रथम उद्दिष्ट आहे. भारतातील जमातवादाचा आंतरिक शक्तीस्त्रोत जात-वर्ग-पितृसत्ताक व्यवस्था आहे, हे वास्तव अभ्यासाद्वारे पुढे आणणे. भारतीय समाजातील उच्चजातवर्गीय अभिजनांनी स्वसमूहाची सत्तासाधने, शोषण-शासन टिकविण्यासाठी जमातवादाचे हत्यार वापरले, हे अभ्यासणे.

२. जमातवादी शक्तींनी पितृसत्ताक संबंध जातीच्या माध्यमातून बळकट करण्यासाठी धर्म व विचारप्रणाली वापरली आहे. 'स्वजमातीची स्त्री ही स्वजमातीच्या इज्जतीचे प्रतिक आहे आणि तिला लैंगिकदृष्ट्या परजमातीय पुरूषाने अंकित करणे, हा स्वजमातीचा व स्वजमातीय पुरूषाचा सर्वोच्च अपमान आहे', ह्या पितृसत्ताक धारणा जातीचे, जमातीचे आणि धार्मिक नियम म्हणून जमातवादात कार्यरत असतात. जमातीय तणाव आणि संघर्ष वाढण्यास ह्या धारणा कारणीभूत असतात, हे वास्तव अभ्यासणे.

३. पाकिस्तानची निर्मिती करणारी फाळणी, काश्मीरच्या स्वायत्ततेचा प्रश्न, गुजरात दंगल, खलिस्तानची अलगतावादी मागणी ह्या सर्वांच्या घडणीमध्ये जात-वर्ग-पितृसत्ता ह्या सर्व शक्तींचा प्रभाव राहिलेला आहे. ह्या शक्तींच्या परस्परपोषक आंतरक्रियेतून जमातवाद उभा राहिला आहे, हे तथ्य समोर आणणे.

४. भारतातील उच्चजातवर्गीय अभिजनांच्या सहमती-समावेशन तत्वाच्या राजकारणातून प्रारंभी जमातवाद मर्यादित होता. मात्र, ही तत्वे राजकीयदृष्ट्या अनुपयोगी ठरू लागताच जमातवादी राजकारणाची वाढ दिसू लागते. हिंदू, मुस्लिम, शीख ह्या धर्मांतील उच्चजातवर्गीय अभिजनांच्या सहमती-समावेशनाच्या तत्वातील असमतोल भारतातील जमातवादाच्या विकासात कारणीभूत ठरला, हे वास्तव पुढे आणणे.

५. आंतरविद्यायाशाखीय अभ्यासपद्धतीने पारंपारिक राज्यशास्त्राच्या आणि पारंपारिक इतिहासशास्त्राच्या मर्यादा उघड केल्या आहेत. वास्तव हे बहुविध घटकांनी साकार होत

असते. ह्या बहुविध घटकांची दखल घेऊन केलेले विश्लेषण अधिक वास्तववादी असते. जमातवाद आणि धर्मनिरपेक्षता यांचे पुनर्वाचन आणि नव्याने मांडणी होणे, म्हणूनच आवश्यक आहे. जातलक्षी अन्वेषणपद्धती व स्त्रीवादी सिद्धांत ह्या नव्या प्रवाहांची दखल घेऊन ह्या दोन्हींचे पुनर्वाचन करणे, हे ह्या शोधशोधप्रबंधाचे उद्दिष्ट आहे.

६. स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या विकसातील विविध टप्पे अभ्सासणे. येथे 'विकास' हा शब्द शास्त्रीय अर्थाने वापरला आहे. त्यात जमातवादाच्या वाढीसोबतच जमातावादाच्या स्वरूपातील बदल आणि जमातवादाचा विविध क्षेत्रांतील वाढता आवाका यांचा वेध घेण्याचा प्रयत्न करणे, हे ह्या शोधप्रबंधाचे उद्दिष्ट आहे.

संशोधनाची पद्धती व तंत्र :

ऐतिहासिक वास्तव आणि समकालीन समस्या यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधन आवश्यक असते. संशोधनाचा मूळ हेतू हा ऐतिहासिक वास्तवाचा शोध आणि त्याआधारे समकालीन समस्येवर उपाय हा असतो. हा शोधप्रबंध जमातवादाच्या समस्येचा अभ्यास ऐतिहासिक आणि समकालीन वैज्ञानिक दृष्टिकोनातून करतो. प्रस्तुत संशोधन ऐतिहासिक, समकालीन, सामाजिक-राजकीय, वर्णनात्मक परीक्षणपद्धती साधनांसाठी वापरते. हिंदू, मुस्लिम, शीख ह्या समूहांतील जमातवादी शक्ती, त्यांचे जमातवादासंदर्भात राजकारण, त्याचे पुरावे, त्याला प्रतिक्रया म्हणून येणारे पुरावे यांचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यास हे संशोधन करते. ही साधने अभ्यासतांना कालक्रम, त्याची पडताळणी यांचे तर्कशुद्ध भान हे संशोधन ठेवते. हे संशोधन जमातावादाच्या अभ्यासकांच्या आणि पिडित व्यक्तींच्या मुलाखतींचाही अभ्याससाधन म्हणून वापर करते. ह्या मुलाखतींतील माहितीची पडताळणी करूनच त्या मुलाखतींतील माहिती ह्या शोधप्रबंधात घेतली गेली आहे. जमातवादाची समस्या आणि समकालीन समाजवास्तव हे बहुआयामी आणि बहुक्षेत्रव्यापी-परस्परसंबंधित असल्याने आंतरविद्याशाखीय अभ्यासपद्धतीची मदत हे संशोधन घेते.

प्रकरणांची रूपरेषा :

ह्या शोधप्रबंधात प्रस्तावना, त्यानंतर पाच प्रकरणे, निष्कर्ष आणि शेवटी परिशिष्टे अशी शोधप्रबंधाची रचना आहे. प्रस्तावनेत स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाची पार्श्वभूमी, जमातवादाचे आधारघटक, जमातवादाच्या व्याख्या ह्या मुद्यांचा आढावा घेतलेला आहे. जमातीय

दंगली आणि जमातवाद यांतील फरक यात अधोरेखीत केलेला असून जमातवादाच्या विचारासरणीस उपयुक्त ठरणारा द्विराष्ट्र सिद्धांत थोडक्यात अभ्यासला आहे. जमातवादाचे राजकारण-अर्थकारण हे एकतर्फी मुळीच नाही. ते हिंदू-मुस्लिम-शीख ह्या तत्कालीन तीनही धर्मांतील उच्चजातवर्गीय अभिजनांना आवश्यक आणि परस्परपोषक होते, हे प्रस्तावनेत सप्रमाण स्पष्ट केलेले आहे. भारताची फाळणी आणि पाकिस्तानची निर्मिती, तत्कालीन जमातीय हिंसाचार, त्याचे जात-वर्गीय-पितृसत्ताक आधार यांचे विवेचन प्रस्तावनेत आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील आणि भारतीय उपखंडातील जमातवादी राजकारणाला सामाजिक आधार आहेत. हे आधार जात-वर्ग-पितृसत्ता यांचे आहेत. म्हणूनच फक्त मार्क्सवादी किंवा फक्त स्त्रीवादी अन्वेषणपद्धती भारतातील जमातवादाच्या अभ्यासासाठी अपुरी आहे. प्रस्तावनेत यासाठी जात-वर्ग-लिंगभावलक्षी अन्वेषणपद्धतीचे महत्त्व आणि प्रासंगिकता प्रतिपादन केलेली आहे.

१. प्रकरण पहिले :- 'सहमती-समावेशनाचे राजकीय धोरण आणि जमातवाद (इ.स. १९४७ ते इ.स. १९६७)'

ह्या प्रकरणात सहमती-समावेशन ह्या धोरणाचा अर्थ, त्याचा जमातवादाशी असलेला निकटचा संबंध, त्यावर भाष्य करणारे विविध राजकीय अभ्यासक आणि इतिहासकार यांच्या मांडणीचा आढावा घेतला आहे. तसेच इ.स. १९४७ ते इ.स. १९६७ ह्या कालखंडातील जमातवादाला सहाय्यभूत ठरलेल्या घटनांचाही परामर्श घेतला आहे. इ.स. १९४७ ते इ.स. १९६७ ह्या काळात स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवाद आणि राष्ट्रवादाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप पुढे आले. प्रारंभी राष्ट्रवादाच्या अभिजानकेंद्री चौकटीत पृथकात्मक चळवळी / वंशसांस्कृतिक घटक सामावले गेले व ते काही काळ फुटीरतेकडे गेले नाहीत. सहमती-समावेशनाच्या सत्ताधारी धोरणातील विविध राजकीय, आर्थिक, सामाजिक घटकांच्या प्रभावाचा तो भाग होता. त्यामुळे भारतीय राष्ट्रवाद आणि जमातवाद यांवर प्रभाव ठेवणाऱ्या पायाभूत घटकांचा अभ्यास आवश्यक ठरतो. इ.स. १९४७ ते इ.स. १९५३ पर्यंत हिंदू विरूद्ध मुस्लिम अशा प्रत्यक्ष जमातीय हिंसेचा प्रश्न काही अंशी निकालात निघाल्याचे चित्र होते. मात्र इ.स. १९५३ च्या कोटा दंगलीने ह्या धारणेस पहिला झटका दिला. पाकिस्तान ह्या मुस्लिम राष्ट्राची मागणी करणाऱ्या मुस्लिम उच्चजातवर्गीय 'अश्रफ' अभिजनांचे गट मोठ्या संख्येने पाकिस्तानात निघून गेलेले होते. मात्र, फाळणीच्या धक्क्यामुळे अजूनही जमातवाद अस्तित्वात होता. हिंदू उच्चजातवर्गीय

अभिजनांतील जमातवादी गटांसाठी पाकिस्तानची निर्मिती ही ऐतिहासिक जखम ठरली. मुस्लिम अभिजनांतील जमातवादी गटांनी मिळवलेले हे राजकीय सत्तास्थान भारतातील जमातवादी हिंदू अभिजनांना प्राप्त करता आले नव्हते. त्यातूनच फाळणीचा सूडगंड, गांधीहत्या, भारतीय मुस्लिमांच्या राष्ट्रनिष्ठांविषयी संशय, समान नागरी कायद्याचा प्रश्न, हिंदू कोड बिलाचा प्रश्न, उर्दूच्या विशेष दर्जाचा मुद्दा, तसेच कोटा, जबलपूर, रूरकेला, जमशेदपूर, मेरठ येथील जमातीय दंगली यांमुळे स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादास नवे स्वरूप प्राप्त झाले. ह्या कालखंडात काही जमातीय दंगली घडल्या. परंतु, त्या फाळणीतील दंगलींप्रमाणे व्यापकता, सातत्य धारण करू शकल्या नाहीत. यामागे स्वतंत्र भारतातील हिंदू, मुस्लिम व शीख उच्चजातवर्गीय अभिजनांतील सत्तावाटपासाठी असलेले सहमती-समोवशनाचे तत्व कारणीभूत होते. ह्या प्रकरणात सहमती-समावेशन ह्या धोरणाचा अर्थ, त्याच्या मांडणीचा आढावा घेतला आहे. तसेच इ.स. १९४७ ते इ.स. १९६७ ह्या कालखंडातील जमातवादाला सहाय्यभूत ठरलेल्या घटनांचाही परामर्श घेतला आहे. जमातवादाचा विकास हा एकसाची नाही. तो सामाजिक-राजकीय परिघातून विकसित होत मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांना व्यापतो. त्याचे दर्शनी उद्दिष्ट जरी आर्थिक अथवा राजकीय हितसंबंध हे दिसत असले, तरी सामाजिक जीवनावरील उच्चजातवर्गीय अभिजनवादी पकड अधिकाधिक घट्ट करण्याचे उद्दिष्ट तो ठेवतो. म्हणूनच जमातवादाचे कर्ते घटक (Actors), त्यांचे राजकारण-समाजकारण अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. काँग्रेस राजवटीतील सर्वधर्मीय उच्चजातवर्गीय सहमती-समावेशन, त्यांचे पितृसत्तेच्या आधारावर झालेले एकमत, त्यातून उद्भवणारा जमातवाद, हिंदू, मुस्लिम व शीख जमातवादी घटकांचे उच्चजातवर्गीय हितसंबंध हे प्रकरण अधोरेखित करते.

ह्या प्रकरणात बंगालमधील कोलकाता व बिहारमधील नोआखाली (इ.स. १९४७), पंजाब (इ.स. १९४७), कोटा (इ.स. १९५३), जबलपूर (इ.स. १९६१), जमशेदपूर (इ.स. १९६४) ह्या दंगलींचा अभ्यास केलेला आहे. ह्या दंगलींत हिंदू विरूद्ध मुस्लिम अभिजनांतील व्यापारी अथवा राजकीय स्पर्धा, लिंगभाव-पितृसत्ता हे मुद्दे ठळकपणे पुढे येतात. हिंसेचे हिंदू आणि मुस्लिम यांतील भिन्न-भिन्न असे स्वरूप-कार्यपद्धती लक्षात येते. ह्या हिंसेच्या भिन्न कार्यपद्धतीमागे दोन्ही धर्मांतील पितृसत्तेची भिन्न-भिन्न तत्वे कार्यरत असल्याचा मुद्दा हे प्रकरण मांडते.

२. प्रकरण दुसरे :- 'नवमागणीकर्ते जातवर्ग, प्रदेशवाद आणि जमातवादाचे बदलते स्वरूप (इ.स. १९६७ ते इ.स. १९७७)'

इ.स. १९६७ ते इ.स. १९७७ ह्या काळातील जमातवाद, त्याच्या स्वरूपातील बदल व विकास यांचा अभ्यास करण्यासाठी तत्कालीन राजकीय प्रक्रिया, ह्या प्रक्रियेतील जातवर्गीय पैलू, ह्या पैलूंचा जमातवादाशी असलेला संबंध, जमातवादाच्या संदर्भातील महत्त्वपूर्ण घटना, ह्या घटनांचे बदलते स्वरूप, जमातवादाची मानसिकता इ. मुद्दे महत्त्वपूर्ण ठरतात. ह्या प्रकरणात हिंदू, मुस्लिम जमातवादासोबतच शीख जमातवादाचाही अभ्यास केलेला आहे. जमातवाद ह्या विचारधारेला धर्माचे बंधन नसले, तरी विविध धर्मांतील जमातवादी राजकारण, संघर्ष आणि त्याचे दृश्य परिणाम-तीव्रता भिन्न-भिन्न असते. जमातवाद ही राजकीय प्रक्रियाही असल्याने बहुसंख्याक, अल्पसंख्यांक असा विचार अभ्यासकाला करावाच लागतो. कारण राजकीय प्रक्रियेत संख्याबळ हे प्रभावी सत्तामाध्यम असते. विविध धर्मांतील जमातवादी शक्तींचा अभ्यास करतांना 'जातवर्ग' ह्या घटकांची एकत्रितपणे दखल अभ्यासकांनी घेतलेली नाही. विशेषतः, शीख राजकारण आणि पंजाबच्या प्रश्नासंदर्भात असा अभ्यास झालेला नाही. त्यावर विश्लेषण करण्याचा प्रयत्न हे प्रकरण करते. ह्या प्रकरणात इ.स. १९६७ ते इ.स. १९७७ ह्या कालखंडातील जमातवादासंदर्भात जातवर्गलिंगभावलक्षी अन्वेषणपद्धतीचे एकत्रितपणे लागूकरण करून विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

इ.स. १९६७ पर्यंत उच्चजातवर्गीय अभिजनांचे प्रतिनिधित्व करणारा सत्ताधारी काँग्रेस पक्ष हा मध्यम-निम्न जातवर्गीय समूहांच्या मागण्यांची किमान पूर्तता सहमती-समावेशनाद्वारे करत होता. मात्र, इ.स. १९६७ नंतर सत्ताकेंद्रांमध्ये आर्थिक लाभात वाटेकरी म्हणून सामावून घेण्यासाठीच्या निम्न व मध्यम जातवर्गीय समूहांच्या मागण्या वाढल्या. नवस्वतंत्र भारत राष्ट्रात स्वातंत्र्याच्या वीस वर्षानंतर निम्न-मध्यम जातीवर्ग विविध मागण्यांद्वारे राजकीय प्रतिनिधित्व, आर्थिक लाभांचा वाटा मागत होते. त्यांच्या आंदोलनांना स्वजात-स्वधर्म-स्वजमात अशा अस्मितांचा पैलू स्पष्ट व तीव्र होता. उच्च जातवर्गीय अभिजन नेतृत्व विपक्षांतही असल्याने ह्या मागणीकर्त्या समूहांना जमातग्रस्त (communal) भान मिळण्याचा धोका अधिक होता. सत्तापक्ष व विपक्ष यांतील उच्चजातवर्गीय अभिजनांनी स्वतःचा सत्तेतील वाटा कमी होऊ नये, यास्तव जात-धर्म प्रादेशिक अस्मिता चुचकारत निम्न-मध्यम जातवर्गीय समूहांच्या असंतोषास

जमातवादी वळण देण्याचा मार्ग पत्करला. सत्तापक्ष व विपक्षातील फुट ही सहमती-समावेशन ह्या प्रक्रियांच्या ऱ्हासामुळे घडते. विपक्षांचे स्वरूपही उच्चजातवर्गीय अभिजनवादी आहे. मात्र विपक्षांचा उदय-विकास हा सत्तापक्षातील किमान सहमती-समावेशनाच्या ऱ्हासातूनसुद्धा घडतो. यातून सत्तापक्ष असलेल्या कॉग्रसचे स्वरूपही बदलते. मात्र, तो पूर्णत:, प्रभावहीन होत नाही. ह्या प्रक्रियेचा परिणाम जमातवादावर होतो. जमातवादाची तीव्रता पूर्वीपेक्षा वाढते. मात्र, सत्तापक्षाच्या अजूनही अस्तित्वात असलेल्या भारताव्यापी-केंद्रीय सत्ताधारी स्वरूपामुळे जमातवाद भारतव्यापी होत नाही. विपक्षाच्या जमातवादी राजकारणाला 'आर्थिक विकास' किंवा 'छुप्या जमातवादाचे धोरण' (Hidden Communalism) यांद्वारे प्रतिकार करत सत्तापक्ष कॉंग्रेस मतपेढीचे राजकारण करतो. ह्या राजकीय प्रक्रियेत जमातवाद वाढतो. मात्र, राष्ट्रव्यापी होत नाही. 'जमातवादाचे राष्ट्रव्यापी होणे म्हणजे विपक्षाचे सत्तेवर येण्याचे संकेत असतात', ह्या शक्यतेच्या जाणीवेतून सत्तापक्ष जमातवाद राष्ट्रव्यापी स्वरूपाचा होऊ देत नाही. निम्न-मध्यमजातवर्गीय घटकांची वाढत्या प्रतिनिधीत्वाची मागणी व तिचे अवलंबन बदलत्या राजकीय प्रक्रियेसंदर्भात जमातवादाच्या अनुषंगाने पुढे आले. सत्ताधारी व विपक्ष यांच्या नेतृत्वाने ह्या मागण्या जमातवादी पद्धतीने हाताळल्या.

इ.स. १९६७ ते इ.स. १९७७ ह्या काळात गुजरात हे राज्य हिंदुत्वाची प्रयोगशाळा म्हणून प्रथमच समोर आले. इ.स. १९६९ ची अहमदाबाद दंगल ह्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. पाकिस्तानद्वेष, गोहत्याबंदीचे राजकारण, स्थानिक हिंदू-मुस्लिम व्यापाऱ्यांमधील आर्थिक स्पर्धा, हिंदू महिलांचा दंगलीतील चिथावणीखोर सहभाग, शिव जयंती आणि मोहर्रमच्या मिरवणूकांचे जमातीय हिंसाशास्त्र यांचा जात-वर्गीय-लिंगभावलक्षी अंगाने अभ्यास ह्या प्रकरणात केलेला आहे. निम्नजातवर्गीय गुजराती कामगार, पितृसत्तेद्वारे शोषित स्त्रिया, महाराष्ट्रातील भिवंडी, मालेगाव आणि मुंबईतील कामगार वर्ग यांचे उच्चजातवर्गीय अभिजनवादी-व्यापारी हितसंबंधासाठी घडविले गेलेले 'जमातीकरण' हे प्रकरण अभ्यासते.

३. प्रकरण तिसरे :- 'जमातवादग्रस्त केंद्रशासन, विपक्ष आणि प्रदेशवाद (इ.स. १९७७ ते इ.स. १९८४)'

इ.स. १९७७ ते इ.स. १९८४ हा कालखंड भारतीय राजकारण व जमातवाद यांसंदर्भात महत्त्वाचा आहे. ह्या कालखंडात प्रथमच गैरकॉंग्रसी पक्षांचे-जनता आघाडीचे शासन केंद्रात

सत्तेवर आले. जनता पक्षात गैरकाँग्रेसी पक्षांची आघाडी होती. त्यात जनसंघ हा हिंदुत्ववादी पक्षदेखील होता. ह्या सत्तांतराला काही घटक कारणीभूत होते. ह्या घटकांनी व प्रदेशवादाने इ.स. १९७७ ते इ.स. १९८४ ह्या काळात जमातवादास आकार दिला. शीख जमातवादाच्या संदर्भात घडलेले राजकारण आणि त्याचे दीर्घकालीन परिणाम, त्यामागील जात-वर्गीय-पितृसत्ताक शक्ती यांचा अभ्यास ह्या प्रकरणात केलेला आहे. पंजाबी सुभ्याची प्रादेशिक स्वायत्तेची मागणी, तिचे जमातीकरण, खलिस्तानच्या स्वतंत्र शीख राष्ट्राची मागणी असा जमातवादाच्या विकासाचा हा टप्पा होता. त्याला शिखांमधील खत्री, अरोरा, जाट शीख उच्चजातवर्गीय अभिजनांच्या हितसंबंधी राजकारणाचे पैलू होते. याविरूद्ध पंजाबमधील हिंदू ब्राह्मण, बनिया, कायस्थ आणि राजपूत उच्चजातवर्गीय अभिजन हे 'हिंदी, हिंदोस्तान' ही मागणी रेटत होते. 'हिंदू विरूद्ध मुस्लिम' हा मुद्दा आता बाजूला पडून 'हिंदू विरूद्ध शीख' असे स्वरूप जमातवादी राजकारणास मिळाले होते. ह्या राजकीय बदलास काही कारणे होती. जमातवादी पक्ष-संघटना ह्या अधिक वेगाने वाढत होत्या व नागरी पक्षांचे जमातीकरण घडून जमातवादास जनाधार प्राप्त होत होता. सत्ताधारी काँग्रेस पक्षाने इ.स. १९७५ मध्ये लादलेल्या आणीबाणीमुळे भारतीय राजकारणाचे गैरकाँग्रेसीकरण व्हावे, अशी मागणी सर्व राजकीय पक्ष व सामाजिक स्तरांतून होऊ लागली. म्हणून काँग्रेसला पर्याय म्हणून धर्मनिरपेक्ष शक्तींनी जनता आघाडीत जनसंघ ह्या हिंदूत्ववादी पक्षाचाही समावेश केला. 'राजकारणाचे कोणत्याही किंमतीवर गैरकाँग्रेसीकरण व काँग्रेसला सत्ताच्युत करणे', हे धोरण त्यामागे कार्यरत होते. त्यातूनच जमातवादी अस्मितांना गोंजारणे हे विपक्ष व काँग्रेसकडूनही घडले. इ.स.१९७७ मध्ये प्रथमच गैरकाँग्रेसी सरकार केंद्रात सत्तेवर आले व इ.स१९७९ पर्यंत टिकले. दरम्यानच्या काळात काँग्रेसनेही अल्पसंख्यांक व विविध वर्गांच्या मागण्या लक्षात घेऊन जमातवादी अस्मिता चूचकारण्यास प्रारंभ केला. संसाधने कमी व जनसमूहांचे प्रतिनिधित्व आणि विकासात-सत्तेत वाटा मागणे अधिक, ह्या स्थितीमुळे जनमागण्यांचे जमातीकरण वेगाने घडले. विविध जनसमुहांच्या मागण्या ह्या दुसऱ्या जनसमुहांच्या हितसंबंधांशी विरोधाभासी बनल्याने राजकारणाचे-मागण्यांचे जमातीकरण (Communalization) वेगाने घडले. तसेच आणीबाणीतील राजकीय दडपशाहीमूळे विविध जनसमूह काँग्रेसला पर्याय म्हणून गैरकाँग्रेसवादाच्या प्रभावातून जमातवादी पक्ष-संघटनांकडे सरकले. जनसंघ., आर.एस.एस. व जमात-ए-इस्लामीची वाढ याचे निदर्शक आहे. जनसमूहांच्या वाढत्या मागण्यांवर प्रभावी तोडगा काँग्रेसकडे नव्हता व काँग्रेसवरील सुरवातीपासनूच्या मवाळ हिंदुत्वाच्या प्रभावामुळे काँग्रेस पक्ष

जमातवादासंदर्भात सरळसोट व प्रत्यक्ष भूमिका घेऊ शकत नव्हता. काँग्रेस पक्ष हा हिंदू, मुस्लिम उच्चजातवर्गीय अभिजनांना किमान सहमतीवर एकत्र आणणारा पक्ष होता. ही किमान सहमती कालौघात नवीन मागण्यांमुळे मागे पडली. जमातीय अस्मिता, जमातीय मागण्या पुढे येऊ लागल्या. ह्या मागण्यांना काँग्रेस नेतृत्वाने राजकीय स्वार्थासाठी प्रतिसाद दिला. ह्या मागण्यांचे अधिकाधिक जमातीकरण होऊ दिले. यामागे साम्यवादी प्रभाव रोखणे (शिवसेना व साम्यवादी पक्षाच्या मुंबईतील संघर्षात शिवसेनेला पाठिंबा देत साम्यवादी प्रभाव रोखणे), पंजाबात अकाली दलाच्या फतेहसिंग गटाचा प्रभाव रोखण्यासाठी अतिरेकी भिंद्रनवाले यास पाठींबा देणे, ही कारणे होती. जमातीय अस्मिता वापरून प्रादेशिक पातळीवर जमातवादाचा राजकीय स्वार्थासाठी वापर करणे काँग्रेस नेतृत्वाने आरंभिले. ह्या काळात काँग्रेस आणि विपक्षाच्या राजकारणामुळे जमातवादी शक्ती मुख्य प्रवाहात आल्या. आणीबाणीनंतर बनलेल्या जनता सरकारमध्ये जनसंघ आणि आर.एस.एस. चे नेते सहभागी होते. तसेच पंजाब समस्येचे जमातीकरण शीखांतील जमातवादी घटकांना पोषक ठरले. यातून जमातवादाचा आकृतिबंध बदलत गेला.

इ.स. १९८४ च्या दिल्लीतील शीखविरोधी दंगलीत हिंदूतील निम्नजातीय समूहांच्या झुंडींनी भटक्या शिखांवर हल्ले आणि लैंगिक अत्याचार केले. स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या इतिहासात प्रबळ दाता-आश्रित संबंधांचे हे जमातीय प्रकटन होते. जमातावाद हे हत्यार शोषित-निम्नजातवर्गीय घटाकांनाही आभासी शत्रू प्रदान करते आणि जातीय उतरंडीत भटके हे दलितांपेक्षाही निम्न आहेत, हे दाहक समाजवास्तव ह्या दंगलीने पुढे आणले. ह्या दंगलीनंतर हिंदू जमातवादी घटकांनी शीखांतील काँग्रेसविरोधी लाटेचा फायदा घेत हिंदू-शीख एकत्रित असे जमातीय संघटन उभे करण्याचा प्रयत्न आरंभिला. तसेच अयोध्येतील राममंदिराचा मुद्दा विश्व हिंदू परिषदेने घेतला. त्याआधारे रामाच्या प्रतीकास वापरून इतर मागास वर्गीय घटकांचे जमातीकरण घडविले गेले. मंडल आयोगाच्या शिफारशींना असलेला उच्चजातवर्गीय अभिजनांचा विरोध जमातवादी राजकारणातून उघडपणे स्पष्ट झाला. भारतीय राजकारण-समाजकरणात प्रथमच जात-वर्गीय शोषण आणि जमातवाद यांचा घनिष्ट संबंध पुढे आला.

४. प्रकरण चौथे :- 'राजकीय पक्षांचे जमातवाद तुष्टीकरण आणि व्यापक जमातीय दंगली (इ.स. १९८४ ते इ.स. १९९३)'

ह्या प्रकरणात जमातवादी राजकारणाचे 'हिंदू विरूद्ध शीख' ह्या मुद्यावरून पुन्हा 'हिंदू विरूद्ध मुस्लिम' ह्या मुद्याकडे झालेले स्थित्यंतर अभ्यासले आहे. ह्या प्रकरणात मंडल प्रश्न, राममंदिर आंदोलन, बाबरीविध्वंस, काशी-मथुरेचा मुद्दा, मुंबई दंगल ह्या मुद्यांचा परामर्श घेतला आहे. इ.स.१९८४ ते इ.स.१९९३ ह्या काळात केंद्रीय सत्ताधारी पक्ष काँग्रेस व विपक्षांचे राजकारण जमातवादाचे तुष्टीकरण करणारे बनले होते. त्यामुळे व्यापक, अतितीव्र, अतिदाहक जमातीय दंगली इ.स.१९८४ ते इ.स.१९९३ ह्या काळात घडल्या. केंद्रीय सत्ताधारी काँग्रेस पक्षाची जमातवादासंर्भात गोची झालेली होती. कारण, हिंदू-मुस्लिम उच्चजातवर्गीय अभिजनांच्या सहमती-समावेशनाची केव्हाच माघार घडलेली होती. तसेच हिंदू-मुस्लिम उच्चजातवर्गीय अभिजनांना अत्याधिक सत्तेवर स्वतःचाच दावा मजबूत करायचा होता. परिणामी, त्यांच्यात स्पर्धा होती. ही स्पर्धा विकासाच्या लाभांशांवर दावा सांगण्यासाठीही होती. त्यातून काँग्रेस पक्षांतर्गत संघर्ष वाढला व 'हिंदू विरूद्ध मुस्लिम' हा संघर्षही वाढला. काँग्रेसच्या नेतृत्वाचे हिंदू व मुस्लिम या दोन्ही अभिजनांना संतुष्ट ठेवणारे धोरण काँग्रेसची गोची करणारे ठरले. काँग्रेसचे नेते निश्चित व धर्मनिरपेक्ष भूमिका घेऊ शकले नाहीत. उदा. शाहबानो खटल्यात इस्लामी पुरूषसत्तेला, शरियत व मुस्लिम वैयक्तिक कायद्याला काँग्रेसने आव्हान उभे राहू दिले नाही. परिणामतः, अतिजहाल जमातवादी भूमिका घेणाऱ्या हिंदू-मुस्लिम जमातवादी पक्ष-संघटनांचा जोर वाढला. राममंदिर आंदोलनाबाबतसुद्धा असेच धोरण काँग्रेसने ठेवल्याने जमातवादी पक्ष-संघटनांचा जोर वाढला. कारण, हिंदू व मुस्लिम असे दोन्ही धर्मांतील अभिजन संतुष्ट राहून ऐक्य कायम राहील, अशी राजकीय-आर्थिक परिस्थिती राहिलेली नव्हती. काँग्रेस नेतृत्वाने संदिग्ध भूमिका घेत रामलल्लाची मूर्ती मशिदीत जाऊ दिली व कारसेवाही सुरू राहू दिली. परिणामी, जमातवादाच्या प्रश्नावर काँग्रेसची गोची झाली. काँग्रेस पक्ष सडेतोड व सरळ भूमिका जमातावादाच्या प्रश्नावर घेऊ शकला नाही.

शहाबानो प्रकरण (इ.स. १९८५), हाशीमपुरा येथील जमातीय हत्याकांड (२२ मे, १९८७), बदाउनची जमातीय दंगल (२८ सप्टेंबर, १९८९), भागालपुरची जमातीय दंगल (२६ ऑक्टोबर, १९८९), हैद्राबादची जमातीय दंगल (७ ते १७ डिसेंबर, १९९०), अलिगढची जमातीय

दंगल (७ ते १० डिसेंबर, १९९०), सुरतची जमातीय दंगल (६ ते १२ डिसेंबर, १९९२), रामरथायात्रेने घडविलेले जमातीय ध्रुवीकरण, बाबरी मशिदीचा विध्वंस (६ डिसेंबर, १९९२), मुंबईच्या जमातीय दंगली (६ डिसेंबर, १९९२ ते मार्च, १९९३), मुंबई बॉम्बस्फोट अशी जमातीय हिंसा-प्रतिहिंसा यांची मालिका हे प्रकरण अभ्यासते. जमातवादाचा हा भडका (शास्त्रीय परिभाषेत 'विकास'-'Development') प्रदीर्घकालीन राजकारण-समाजकरण यांची फलश्रुती होता. ह्या 'विकासाने' जमातवादी राजकारणाचे आयाम बदलले. भारतातीलच नव्हे, तर संपूर्ण उपखंडातील बहुसंख्यांकांच्या झुंडीच्या जमातीय हिंसेला (Mob Communalism) अल्पसंख्यांक जमातवादी गट बॉम्बच्या जमातीय हिंसेने (Bomb Communalism) उत्तर देऊ लागले. ह्या सर्व प्रक्रियेत हिंदू आणि मुस्लिमांतील जमातवादी शक्तींचे आधार असलेले जात-वर्ग-पितृसत्ता हे घटक अधिकच दृढ झाले आणि निम्नजातवर्गीय समूहाचे शोषण सुरळीत झाले. आभासी परधर्मीय शत्रूच्या कल्पनेने शोषणजाणीवा धूसर झाल्या. हिंदू आणि मुस्लिम ह्या दोन्ही धर्मांतील स्त्रियांवरील पितृसत्ताक बंधने वाढली. बेरोजगारी, आरक्षण, मुस्लिम ओ.बी.सी., दलित मुस्लिम हे प्रश्न अधिकाधिक बाजूला पडत गेले. दोन्ही धर्मांतील जमातवादी-उच्चजातवर्गीय-पितृसत्तासमर्थक शक्तींसाठी हा विजय होता.

५. प्रकरण पाचवे :- 'सार्वजनिक अवकाशाचे जमातीकरणः गुजरातच्या विशेष संदर्भात (इ.स. १९९३ ते इ.स. २००२)'

इ.स. १९९३ ते इ.स. २००२ हा कालखंड भारतीय राजकारण आणि समाजकारण यांत महत्त्वाचा मानला जातो. कारण, ह्या काळात भारतीय राजकारण व समाजकारण जमातवादासंदर्भात अतितीव्र झाले आणि जमातवादी राजकारण कमालीचे यशस्वी होऊ लागले. यामागे अनेक कारणे होती. समाजमनाचे जमातीकरण, जमातवादाचे राजकारण व त्यातून राज्ययंत्रणेचे जमातीकरण हे त्यातील प्रमुख कारण होते. परिणामतः भारतात मुख्यत्वे मुस्लिम आणि ख्रिश्चन ह्या अल्पसंख्यांकांवर हिंदू जमातवादी शक्तींचे आक्रमण झाले. जमातवादाला मिळणाऱ्या वाढत्या राजकीय प्रतिसादामुळे, त्याच्या विस्तारामुळे पूर्वी नगण्य विरोधक म्हणून गौण ठरविल्या गेलेल्या ख्रिश्चनांवरही जमातीय हल्ले केले गेले. जमातवादी शक्तींच्या वाढत्या राजकीय-सामाजिक विस्ताराचा तो परिणाम होता. जमातीकरणाच्या वाढत्या विस्तारातून सत्ताधारी, त्यांचे प्रशासन, पोलीस यंत्रणाही सुटल्या नाहीत. इ.स. २००२ मधील गुजरातमध्ये

झालेल्या जमातीय हिंसेकडे ह्याचे ठळक उदाहरण म्हणून पाहता येईल. ह्या प्रकरणात इ.स. २००२ मधील गुजरातच्या जमातीय दंगलीसोबतच ख्रिश्चनविरोधी दंगलींचा, आदिवासी आणि दलितांच्या जमातीकरणाचा, हिंदू जमातवादी राजकारणाचा, त्याला प्रतिक्रियेदाखल होणाऱ्या मुस्लिम दहशतवादी-जमातवादी राजकारणाचा-कारवायांचा मुद्दा अभ्यासला आहे. त्यातील जात-वर्ग-पितृसत्ता ठळकपणे दाखविण्याचा प्रयत्न ह्या प्रकरणात केलेला आहे. गुजरातच्या इ.स. २००२ च्या दंगलीत प्रथमच दलित व आदिवासींचा वापर मुस्लिमांविरूद्ध हिंसेसाठी अत्यंत प्रभावीपणे केला गेला. आदिवासीबहुल गावांत संघ परिवाराने ११,५०० भजनी मंडळे स्थापली होती. त्यांद्वारे घडविलेल्या आदिवासींच्या 'ब्राह्मणीकरण-हिंदूकरणाचे' रूपांतर मुस्लिमाविरोधी जमातवादात-झुंडीकरणात संघ परिवाराने केले. दाहोद भागातील मुस्लिम वस्त्या व उद्योगांवर आदिवासींनी हल्ले केले. संघ परिवाराने दीर्घकाळापासून चालविलेल्या ब्राह्मणीकरण-हिंदूकरणाच्या प्रक्रियेचे परिणाम आदिवासींवर झाले. दलितांना 'हिंदू उपेक्षित' व आदिवासींना 'हिंदू वनवासी' ठरवून ही प्रक्रिया आरंभित केली गेली. विशेषतः, मंडल आंदोलनानंतर भारतात सुरू झालेला आरक्षणाचा मुद्दा धूसर करण्यासाठी विविध जाती-जमातींच्या (विशेषतः दलित, ओ.बी.सी. व आदिवासी) ब्राह्मणीकरण-हिंदूकरणाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी परधर्मद्वेषाचे राजकारण केले गेले. परधर्मद्वेष हे ह्या राजकारणाचे बाह्यांग होते, तर 'उच्चजातवर्गवर्चस्व-सुरक्षितता' हे अंतरंग होते. म्हणूनच 'ओ.बी.सी.से ओम बडा', 'उन्होंने मंडल निकाला, तो हमने कमंडल निकाला' ह्या घोषणा ब्राह्मणी राजकारणातून भा.ज.प.ने दिल्या.

जमातवादाचे राजकारण बाबरीविध्वंसानंतर वेगाने प्रसारित झाले. ह्या काळात दलित पक्ष-संघटना यांना मरगळ आलेली होती. परिणामी, काही दलित पक्ष-संघटनांच्या नेत्यांनी संघ परिवार व भा.ज.प. कडे जाण्याचा मार्ग पत्कारला. यामागे संघ परिवाराचे सामाजिक अभिसरणाचे धोरण (Social Engineering) कारणीभूत होते. वि.हि.प. नेही त्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. 'हिंदू एकता' ही घोषणा देत दलितांना संघ परिवाराकडे आकर्षित करण्यासाठी 'सामाजिक समरसता मंच' हि संस्था कार्यरत केली गेली. यातील मेख म्हणजे सामाजिक-भौतिक आंतरविरोधांकडे, शोषणाकडे दुर्लक्ष घडविले गेले. समान सांस्कृतिक प्रतिके पुढे आणत मतांपुरते धार्मिक ऐक्य साधण्याचा प्रयत्न झाला. दलितांमधील नवमध्यमवर्गास उच्च सामाजिक स्थानाची ओढ लागली होती. ह्या सांस्कृतीकरण-ब्राह्मणीकरण-हिंदूकरण प्रक्रियेत

दलितांना उच्च जातींचे अनुकरण करणे शक्य झाले. त्यामुळे ह्या नवमध्यमवर्गीय दलितांना स्वजातीय शोषित समूहांचा विसर पडला. नवमध्यमवर्गीय दलितांना स्वाध्याय, पांडूरंग शास्त्री आठवले, आसाराम बापू, स्वामी नारायण यांसारख्या डझनावारी सांस्कृतिक-हिंदुत्ववादी घुसळणीत फेकले गेले. हे बाबा त्यांना आधुनिकतेच्या आवरणाखाली ब्राह्मणी-हिंदुत्ववादी मुल्ये देत होते. हे बाबा-गुरु दलितांतील नवमध्यमवर्गात हिंदुत्व-हिंदुत्वाचा गर्व, जमातवाद प्रसारित करण्याचे प्रभावी हत्यार होते.

ज्याप्रमाणे राजीव गांधीच्या नेतृत्वात काँग्रेसला इ.स. १९८५ मध्ये लोकसभेत प्रचंड बहुमत मिळाले होते, त्याचप्रमाणे डिसेंबर २००२ मध्ये नरेंद्र मोंदीच्या नेतृत्वात भा.ज.प. ला गुजरात विधानसभेत बहुमत मिळाले. बाबरीविध्वंस ते गुजरातचा वंशसंहार हा भारताला लोकशाहीच्या मार्गाने धर्मनिरपेक्षतेकडून जमातवादाकडे नेणाऱ्या संक्रमणाचा कालखंड होता. हे संक्रमण राजकीय तसेच सामाजिकही होते. इ.स. १९८४ च्या शीखविरोधी दंगलीनंतर पुन्हा एकदा इ.स. १९९२-९३ मध्ये मुस्लिमविरोधाकडे भारतातील जमातवादाचे स्थानांतरण घडले. इ.स. १९९२ ते इ.स. २००२ हा काळ भारतातील हिंदू जमातवादी शक्तींना बळकटी देणारा ठरला. प्रतिक्रियेदाखल मुस्लिम जमातवादी शक्तीही बळकट झाल्या. ह्या कालखंडापूर्वी इ.स. १९८४ मध्ये काँग्रेस शासनाच्या काळात घडलेल्या शीखविरोधी दंगलीमुळे काँग्रेसदेखील जमातवाद अतिहिंसक पातळीवर घडवू शकते, हे भारतीय जनता ओळखून होती. त्यातूनच भा.ज.प. च्या मुस्लिमविरोधी आणि ख्रिश्चनविरोधी राजकारणाला वैधता प्राप्त झाली. काँग्रेसच्या जमातवादाला व भ्रष्टतेला पर्याय म्हणून भा.ज.प. कडे जनता आकर्षित होऊ लागली. काँग्रेस नेत्यांद्वारे झालेली शिखांची कत्तल शिखांचे पारंपरिक मित्र असलेल्या हिंदू जनतेलाही भावली नाही. त्यांचा समान-पारंपारिक आभासी शत्रू मुस्लिम होता. राजकीय-आर्थिकदृष्ट्या वैफल्यग्रस्त झालेल्या जनतेस भा.ज.प.चे हिंदू एकतेचे राजकारण आकर्षित करू लागले. ही नवजमातवादी अस्मिता अत्याधिक आक्रमक असल्याने तिचा प्रसार तीव्र वेगाने झाला. भारतातील संख्यात्मकदृष्ट्या सर्वात अधिक असलेली अल्पसंख्यांक जमात असणारे मुस्लिम हे भा.ज.प व संघाचे लक्ष्य होते. आदिवासी भागात संघ व भा.ज.प. चे शत्रू ख्रिश्चन मिशनरी हे होते. मुस्लिमद्वेषाचे प्रसारण गुजराती हिंदू समाजावर इतक्या तीव्रतेने घडले की, काँग्रेससारखा तुलनेने धर्मनिरपेक्ष-सहमती-समावेशनवादी पक्षदेखील हिंदू जमातवादाला चुचकारु पाहत होता. गुजरातच्या इ. स. २००२ च्या विधानसभा निवडणुकांत हे चित्र पहायला मिळाले. भा.ज.प.ने

जमातीय हिंसेनंतर प्रचंड बहुमत मिळविणे, हा भारतीय जनतेच्या मतदारांच्या जमातीकरणाचा प्रथम टप्पा होता. जनतेते परमधर्मद्वेष-सूडगंड, त्याची हिंसक अंमलबजावणी जमातवादी राजकीय पक्ष यांबद्दल गुजराती जनतेत आकर्षण निर्माण झाले. राज्याच्या सत्ताधारी पक्षाने आर्थिक मंदीमुळे आलेल्या जनतेतील वैफल्याचा फायदादेखील ह्या जमातीकरणासाठी घेतला. तसेच जागतिक दहशतवाद, मुस्लिमांचे खलत्व वारंवार रंगविणे इ. चा वापर गुजरातमध्ये झाला. प्रबळ विपक्ष असणाऱ्या कॉंग्रेस व डाव्या पक्षांनीही सकारात्मक धर्मप्रबोधन, जमातवादाचे शक्तीस्रोत असलेल्या जातवर्गपितृसत्तेचे एकत्रीत आकलन न केल्याने गुजरातेत जनतेचे जमातीकरण सुलभतेने घडले.

इ.स. २००२ च्या गुजरातमधील जमातीय दंगली, हिंदू जमातवादी संघटनांचा ख्रिश्चनविरोध, दलित - आदिवासींचे जमातीकरण, हिंसाप्रवृत्तीकरण, प्रशासन, पोलीस यंत्रणा यांचे जमातीकरण, हिंदू स्त्रियांचे जमातीकरण आणि त्यांचा हिंसेत प्रत्यक्ष सहभाग, यास प्रतिक्रिया म्हणून येणारा मुस्लिम जमातवाद-दहशतवाद, त्याचे माफियाशी संबंध यांची चिकित्सा हे प्रकरण करते. गुजरातच्या जमातीय हिंसेतील जात-वर्गीय-पितृसत्ताक आधार, हिंदू-मुस्लिम व्यापारी जातींची स्पर्धा, हिंदू-मुस्लिम जमातवाद्यांचे हिंसेचे भिन्न पद्धतीशास्त्र यांचा परामर्श हे प्रकरण घेते. अंततः, गुजरातच्या जमातीय हिंसेचा हिंदू व मुस्लिमांतील उच्चजावर्गीय अभिजनवादी शक्तींना झालेला लाभ, त्यातून बळकट झालेली जात-वर्ग-पितृसत्ताक व्यवस्था हे मुद्दे ह्या प्रकरणात स्पष्ट केलेले आहेत.

शेवटचे प्रकरण हे निष्कर्षाचे आहे. त्यात ह्या संशोधनातील निष्कर्ष आणि जमातवादाच्या समस्येवरील उपाययोजना यांची मांडणी केलेली आहे.

हे संशोधन पुढील निष्कर्ष नोंदवते :

१. स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या संदर्भात पहिला टप्पा इ.स. १९४७ ते इ.स. १९६७ हा आहे. या कालखंडात सहमती-समावेशनाच्या सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाच्या धोरणामुळे हिंदू-मुस्लिम-शीख ह्या तिनही धर्मांतील उच्चजातवर्गीय अभिजनांचे काही समान मुद्यांवर ऐक्य होते. हे ऐक्य स्वधर्मांतील निम्नजातवर्गीय घटकांच्या शोषणासाठी कार्यरत होते. मात्र जमातवादाच्या बदलत्या परिप्रेक्ष्यात क्वचित प्रसंगी ह्या ऐक्याला तडा जाण्याच्या घटना घडल्या. अभिजनांतील ह्या तणावांना सामाजिक, आर्थिक आणि

पितृसत्ताक कारणे होती. तरीही जमातीय तणावाच्या घटना इ.स. १९४७ ते इ.स. १९६७ ह्या कालखंडात अतिमर्यादित राहिल्या. समान आर्थिक-राजकीय-सामाजिक हितसंबंधांमुळे अभिजनांनी जमातवाद आवाक्यात ठेवला.

२. इ.स. १९६७ ते इ.स. १९७७ ह्या कालखंडात स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवाद हा अल्पांशाने विकासमान झाला. कारण, सत्ताधारी काँग्रेस पक्षाअंतर्गत काही तणावाचे मुद्दे उभे राहिले. ह्या मुद्यांना जात-जमातीय आणि प्रादेशिक-भाषिक हितसंबंधांची पार्श्वभूमी होती. ह्या हितसंबंधांमधील विरोधाभास प्रादेशिक पातळीवर जात-जमातीय स्वायत्ततेच्या मागण्यांना हिंसक स्वरुप देणारा ठरला. परंतु सत्ताधारी काँग्रेस नेतृत्त्वाने प्रादेशिक जात-जमातीय अभिजनांना प्रासंगिक स्वायत्तता बहाल करुन प्रादेशिक स्तरावर जमातीय अस्मिता चुचकारण्याचे धोरण सुरु केले. त्यातून देश पातळीवर आणि प्रादेशिक पातळीवरही जमातवाद विकासमान व्हायला आरंभ झाला. ही प्रक्रिया पंजाब, हरियाणा, काश्मिर ह्या राज्यांच्या बाबतीत प्रकर्षाने दिसून आली.

३. इ.स. १९७७ ते इ.स. १९८४ हा कालखंड भारतातील जमातवादाच्या स्वरुपाला कलाटणी देणारा ठरला. जमातीय तणावाचे स्वरुप फक्त 'हिंदू विरुद्ध मुस्लिम' असे न राहता 'हिंदू विरुद्ध शीख' असे झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने वेळोवेळी पंजाब आणि शीख प्रश्नांसंदर्भात भूमिका बदलली. गुरुमुखी लिपी आणि पंजाबी भाषा विरुद्ध देवनागरी लिपी आणि हिंदी भाषा ह्या संघर्षाला शीख विरुद्ध हिंदू हे स्वरूप प्राप्त झाले. ह्या पार्श्वभूमीवर हिंदू जमातवाद्यांची फाळणीपासूनची पारंपरिक मित्रशक्ती असलेली शीख जमातवादी शक्ती हिंदू जमातवाद्यांपासून दूर जाऊ पाहत होती. प्रादेशिक आणि राष्ट्रीय राजकारणात सत्ताधारी काँग्रेस पक्षाने जमातवादाचा मतपेढीसाठी वापर केल्याने मोठे पेचप्रसंग उपखंडात उभे राहिले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा खून आणि त्यानंतर भडकलेल्या इ.स. १९८४ च्या दिल्लीतील शीखविरोधी दंगली ह्या घटनांनी स्वातंत्र्योत्तर भारतात प्रथमच अभूतपूर्व वंशसंहार समोर आणला. इ.स. १९८४ च्या शीखविरोधी जमातीय दंगलीतील अभूतपूर्व बाब म्हणजे निम्नजातीय - दलित समूहांनी भटक्या शीखांवर हल्ले केले. ही बाब दाता-आश्रित राजकीय संबंधांच्या संदर्भात नवी समीकरणे पुढे आणणारी ठरली. भटक्या शीख स्त्रियांवरील जमातीय दंगलीतील लैंगिक हिंसा आंतरछेदिततेची नवी आणि दाहक वास्तवता पुढे आणणारी ठरली.

४. इ.स. १९८४ ते इ.स. १९९३ ह्या कालखंडात सत्ताधारी काँग्रेस पक्षाने जमातवादासंर्भात प्रत्यक्ष आणि सरळ भूमिका घेतली नाही. हिंदू आणि मुस्लिम ह्या दोन्ही धर्मातील जमातवादी शक्तींना चुचकारण्याचे धोरण काँग्रेस पक्षाने ठेवले. शाहबानो खटला आणि आयोध्या प्रसंग ह्या घटनांसंदर्भात काँग्रेसी नेतृत्त्वाच्या जमातवादधार्जिण्या धोरणामुळे अप्रत्यक्षरित्या हिंदू आणि मुस्लिमांतील जमातवादी शक्तींना खुले प्रोत्साहन मिळाले. जमातीय ध्रुवीकरण तीव्र होऊन बाबरीविध्वंस घडला आणि भारतीय राजकारणात हिंदू जमातवादी शक्ती प्रबळ व्हायला सुरुवात झाली. मुंबईमधील जमातीय दंगली पोलीस आणि प्रशासन यंत्रणेचे जमातीकरण खुलेआम दर्शविणाऱ्या ठरल्या.

५. इ.स. १९९३ ते इ.स. २००२ हा कालखंड स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. कारण ह्या कालखंडात दलित, आदिवासी, स्त्रिया ह्या जमातवादविरोधी नैसर्गिक शक्तींचेच जमातीकरण घडले. हिंदू मध्यमवर्गीय स्त्रिया प्रथमच मुस्लिमविरोधी जमातीय हिंसेत सक्रियरित्या सहभागी झाल्या. हे जमातीकरण सांस्कृतिकरण-ब्राह्मणीकरण-हिंदूकरण ह्या क्रमाने घडवून आणले गेले. समाज परिवर्तक जातीअंतक चळवळींची पिछेहाट ह्या जमातीकरणाला कारणीभूत होती. ह्या जमातीकरणाची फलश्रुती गुजरातमधील इ.स. २००२ च्या जमातीय हिंसाचारात दिसून आली. इ.स. २००२ पासूनचे भारतीय समाजातील जमातीय ध्रुवीकरण मुस्लिम आणि ख्रिश्चन ह्या अल्पसंख्यांक समुदायांसाठी सर्वोच्च असुरक्षेची भावना निर्माण करणारे ठरले. त्याची परिणीती हिंदू जमातवाद्यांची झुंडीची हिंसा विरुद्ध मुस्लिम जमातवाद्यांची बाँबची हिंसा ह्या नित्याच्या हिंसेत झाली. भारतासह संपूर्ण उपखंडाने त्याचे परिणाम भोगले.

६. स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या विकासात प्रथमदर्शनी परधर्मद्वेष हे कारण पुढे येते. परंतु इ. स. १९४७ ते इ. स. २००२ ह्या कालावधीतील जमातीय दंगलींमध्ये उच्चजातवर्गीय अभिजनवादी सामाजिक-आर्थिक प्रभुत्वाचे जतन करणे, हे उद्दिष्ट हिंदू, मुस्लिम, शीख यांतील जमातवादी शक्ती बाळगून होत्या. पाकिस्तानची निर्मिती ही मुस्लिम उच्चजातवर्गीय अभिजन (अश्रफ) नेतृत्वाच्या राजकीय, आर्थिक लाभांसाठी झाली होती. उर्दूचा प्रश्न, अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या अल्पसंख्यांक दर्जाचा प्रश्न, इ. स. १९८४ मधील शीखविरोधी दंगल, इ. स. १९९२-९३ ची जमातीय दंगल (मंडल

विरुद्ध कमंडल) यांत राजकीय, आर्थिक प्रभुत्व हा मुद्दा एक समान धागा आहे. भारतातील जमातवादी राजकारणाने त्यांची सिद्धता वेळोवेळी केली आहे.

७. भारतातील जातीय समीकरणे फक्त निवडणुकीपुरती मर्यादित नाहीत. ह्या जातीय समीकरणांना प्रदीर्घ काळाची सामाजिक प्रभुत्वाची परंपरा आहे. याचा परिणाम भारतातील जमातवादावर वेळोवेळी दिसून येतो. कारण, जमातवादाचा आंतरिक शक्तीस्रोत जातवर्गपितृसत्ताक व्यवस्थेचे जतन हा आहे. म्हणूनच जमातीय दंगलींचा दीर्घकालीन लाभ हिंदू, मुस्लिम, शीखांतील उच्चजातवर्गीय अभिजनवादी शक्तींना होतांना दिसतो. जमातवादी पक्ष, संघटनांना निवडणुकीत यश तर मिळतेच. मात्र, त्यांची समाजमनावरील पकड बळकट होते. शोषित, उपेक्षित निम्नजातवर्गीय समूहांचा स्वधर्मीय उच्चजातवर्गीय अभिजनांच्या विरुद्धचा असंतोष आभासी परधर्मीय शत्रूकडे वळविण्यात येतो. जमातीय तणाव अथवा जमातीय हिंसेनंतरचे हिंदू, मुस्लिम, शीख यांचे दैनंदीन संबंध कमालीच्या संशयाने बनतात. ह्या प्रक्रीयेमागे केवळ आर्थिक कारण कार्यरत नसते. तर, जातपितृसत्ताक व्यवस्थासुद्धा कार्यरत असते. जमातवादाचे शत्रू असलेल्या वर्गवादी अभ्यासकांनी भारतातील समाजव्यवस्थेचे वास्तव (जातवर्गपितृसत्ता) दुर्लक्षित केल्याने जमातवादाचे परिपूर्ण आकलन त्यांना होत नाही.

८. पितृसत्ताक समाजव्यवस्थेचे जतन, संवर्धन, स्वजातीय स्त्रियांवर लैंगिक नियंत्रण, स्वजातीय स्त्रियांच्या लैंगिक पुर्नउत्पादनावर नियंत्रण हे हिंदू, मुस्लिम, शीखांतील जमातवादी शक्तींचे मुख्य ध्येय आहे. म्हणूनच जमातीय दंगली ह्या परजमातीय स्त्रियांना लैंगिकदृष्ट्या अंकित करणाऱ्या असतात. तसेच स्वजमातीय स्त्रियांना अधिकाधिक लैंगिक नियंत्रणात ठेवणाऱ्या असतात. स्वजातीय स्त्रीला स्वजमातीच्या सन्मानाचे सर्वोच्च प्रतिक मानून तिच्या लैंगिकतेवरील परजमातीय पुरुषाचे वर्चस्व हा स्वजमातीय पुरुषांचा सर्वोच्च अपमान मानला जातो. इ. स. १९४७ ते इ. स. २००२ ह्या कालावधीतील जमातीय दंगलींत म्हणूनच स्त्रियांवरील लैंगिक हिंसा हा ठळक मुद्दा अधोरेखीत करता येतो. जमातवादी शक्तींचे राजकारण, समाजकारण लैंगिकतेच्या मुद्यावर पितृसत्तासंवर्धनासाठी कार्यरत राहते.

९. परधर्मद्वेषाच्या जमातीय राजकारणासाठी जमातवादी शक्ती सामुहिक स्मृती, सामुहिक आघात, सामुहिक गौरव यांचा विपर्यस्त वापर करत असतात. यासाठी इतिहासाचे

विकृतीकरण केले जाते. पाकिस्तानची निर्मिती हा इतिहास मुस्लिमांतील जमातवादी शक्तींसाठी सामुहिक गौरव म्हणून त्यांच्या मानसिकतेत कार्यरत असतो. तर त्याच वेळी हिंदूंतील जमातवादी शक्तींसाठी हा सामुहिक आघात असतो. बाबरी मशिद हा मुस्लिमांतील जमातवादी शक्तींना सामुहिक गौरव वाटतो. तर तिचे भंजन हे हिंदूंतील जमातवादी शक्तींना सामुहिक गौरव, मर्दानगीची भावना बहाल करते. मात्र मध्ययुगीन इतिहासातील घटनांचे आकलनच जमातीय अंगाने वारंवार मांडल्यामुळे मध्ययुगीन राजकीय संघर्ष हा सत्य स्वरुपात समाजमनापुढे येत नाही. हा राजकीय संघर्ष धार्मिक, जमातीय म्हणून रंगविण्यात हिंदू, मुस्लिम, शीखांतील जमातवादी शक्तींचे हितसंबंध असतात. म्हणूनच 'हस-हस के लिया पाकिस्तान', 'छीन के लेंगे हिंदुस्तान' किंवा 'मंदिर वही बनायेंगे', 'यह तो बस झांकी है, कशी-मथुरा बाकी है' ह्या घोषणा जमातवादी शक्ती वारंवार करत असतात. 'हमें क्या चाहिए ?... आझादी. आझादी का मतलब क्या है ? या इलाहा इलल्लाह', 'बाबर कि संतान, जाओ पाकिस्तान.. पाकिस्तान या कब्रस्तान', 'राज करेगा खालसा', 'खलिस्तान झिंदाबाद' अशा घोषणा जमातवादी शक्ती देतात. ह्या घोषणांमागे हिंदू, मुस्लिम, शीखांतील सामुहिक स्मृती चेतविण्याचा प्रयत्न असतो. मात्र, ह्या सामुहिक स्मृतींचे आकलनच अपूर्ण असल्याने, त्याचे इतिहासात वारंवार विकृतीकरण केल्याने समाजमानस वेगाने जमातीय ध्रुवीकरण स्वीकारते. ह्या प्रक्रियेत अनेक धर्मनिरपेक्ष प्रतीकांचे (अकबर, राणा प्रताप, छ. शिवाजी, छ. संभाजी, महाराजा रणजीत सिंघ इ.) 'जमातीकरण' घडविले जाते.

१०. धर्म आणि संस्कृती ही जमातवादी शक्तींची हत्यारे आहेत. परंतु, धर्म आणि संस्कृतीचे व्यापक आकलन जमातवादविरोधी अभ्यासकांनी केले नाही. मार्क्सवादी अभ्यासप्रवाह जमातवादाकडे केवळ आर्थिक संघर्ष म्हणून पहातो. तर जातीविरोधी अभ्यासप्रवाह केवळ जातीय शोषणाचा पैलू अधोरेखीत करतो. स्त्रीवादी अभ्यासक जमातवादाकडे केवळ स्त्रीविरोधी किंवा पितृसत्ताक प्रक्रिया म्हणून पाहतात. मात्र, भारतातील जमातवाद हा जातवर्गपितृसत्ता ह्या तिहेरी पायावर उभा आहे. भारतातील वर्गनिर्मिती ही जात आणि पितृसत्ता यांची अनन्यसाधारण वैशिष्ट्ये आणि हितसंबंध घेऊन कार्यरत आहे, हे वास्तव अभ्यासकांनी दुर्लक्षिले आहे. म्हणूनच जातवर्गलिंगभावलक्षी अन्वेषण पद्धतीची आवश्यकता अभ्यासक्षेत्रात आहे. ह्या शोधप्रबंधात जमातवाद, त्याचे राजकारण,

समाजकारण, जमातीय हिंसा, तिची कार्यपद्धती यांचा अभ्यास जात वर्ग लिंगभावलक्षी अन्वेषणपद्धतीने केलेला आहे.

११. भारतीय समाजव्यवस्थेत जातीय शोषण आहे. ही प्रक्रिया हिंदू, मुस्लिम, शीख यांच्यातही दिसते. कारण, ह्या समूहांतही जातिव्यवस्था आहे. जातीय शोषण आहे. हिंदू उच्चजातवर्गीय अभिजन, मुस्लीमांतील उच्चजातवर्गीय अभिजन (अश्रफ), शीखांतील उच्चजातवर्गीय अभिजन (खत्री, अरोरा, जाट) यांचे हितसंबंध स्वजमातीतील निम्नतम समाजघटकांच्या शोषणात असतात. ह्या शोषणाविरुद्ध निम्नजातवर्गीय समाजघटकांत असंतोष असतो. परंतु, पितृसत्तेचा मुद्धा वापरत (स्वजातीय स्त्रीयांचे परजमातीय आभासी शत्रूपासून संरक्षण), धर्मप्रतीकांचा मुद्दा वापरत, इतिहास आणि ऐतिहासिक स्मृतींची मोडतोड करत स्वधर्म, स्वजमात धोक्यात असल्याचे वारंवार सांगितले जाते. त्यामुळे असुरक्षेतून, भयगंडातून शोषित समूह स्वजमात, स्वधर्म, स्वस्त्रिया यांच्या संरक्षणासाठी एकत्र येतात. स्वधर्मांतर्गत असलेले जातीय शोषण ह्या प्रक्रियेत धूसर होते आणि स्वजमात, स्वधर्म यांचे अंतिमत्व समाजमनावर बिंबविले जाते. ही प्रक्रिया इ. स. १९४७ ते इ. स. २००२ ह्या कालावधीतील सर्व दंगलीत दिसून येते. म्हणून 'गर्व से कहो, हम हिंदू है', 'इस्लाम खतरे मे है' ह्या घोषणा इ. स. १९४७ ते इ. स. २००२ पर्यंतच्या सर्व जमातीय दंगलीत दिसून येतात.

१२. जमातवादी शक्तींचे मुख्य उद्दिष्ट स्वजमातसंघटन हे कधीच नसते. त्यांना त्या-त्या धर्मातील उच्च जातवर्गीय, पितृसत्ताक अभिजनवादी शक्तींचे राजकीय, सामाजिक, आर्थिक हितसंबंध जपत स्वजमातीतच निम्नतम घटकांचे शोषण कायम ठेवायचे असते. पाकिस्तानची निर्मिती ही अश्रफ अभिजनांना सत्तेचा कायमस्वरूपी वाटा देणारी ठरली. त्यानंतर पाकिस्तानात दलित, शिया, अल्पसंख्यांक, मुहाजिर (भारतातून पाकिस्तानात गेलेले मुस्लिम) यांचे जातिआधारित शोषण सुरु झाले. भारतातही सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाचे राजकीय धोरण हिंदू, मुस्लिम, शीखांतील उच्चजातवर्गीय अभिजनांच्या हिताचे राहिले. पितृसत्तेच्या मुद्यावर कॉंग्रेसने मुस्लिम आणि हिंदुंतील उच्चजातवर्गीय अभिजनांच्या हिताचे निर्णय वेळोवेळी घेतले. (हिंदू कोड बिल नाकारणे, समान नागरी कायद्यास नकार, शाहबानो प्रकरणात न्यायालयाचा निर्णय न माणने इ.) कॉंग्रेस पक्षातील सहमती, समावेशन (स्वधर्मीय उच्चजातवर्गीय अभिजनांचे किमान समान मुद्यांवर ऐक्य)

बिघडताच हिंदू, मुस्लिम, शीखांतील जमातवादी शक्ती वाढल्या. त्यांना नेतृत्व आणि राजकीय कार्यक्रम त्या-त्या धर्मांतील उच्चजातवर्गीय अभिजनांनी दिला. त्यासाठी पितृसत्तेच्या मुद्याच्या वारंवार वापर केला गेला. जमातीय दंगलींतील स्त्रियांवरील हिंसा जमातवादाच्या विकासास पोषक ठरली.

१३. ह्या शोधप्रबंधात स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादी राजकारण, जमातीय हिंसा यांचा आधार हा जातवर्गपितृसत्ताक व्यवस्था असल्याची मांडणी केलेली आहे. इ. स. १९४७ मधील फाळणीचे जातवर्गीयपितृसत्ताक पैलू, स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातीय राजकारणाचे जातवर्गलिंगभावलक्षी आकलन ह्या शोधप्रबंधात आहे. उर्दूच्या आणि अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या प्रश्नावरील मुस्लिम अभिजनांचे राजकारण, औद्योगिक शहरांतील दंगलींचे जातवर्गीय पैलू, इ. स. १९८४ ची शीख विरोधी दंगल, इ. स. १९९२-९३ ची मुंबई दंगल, इ. स. २००२ ची गुजरात दंगल यांचे जातवर्गीयपितृसत्ताक आधार ह्या शोधप्रबंधात मांडले आहेत.

१४. जमातीय राजकारण आणि जमातीय हिंसेतील स्त्रियांचा सहभाग हा मुद्दा इ. स. १९६९ च्या गुजरात (अहमदाबाद) दंगलीपासून चर्चेत आहे. स्त्रिया ह्या जमातीय हिंसेच्या प्रथम बळी ठरतात. कारण, पितृसत्ताक समाजरचनेत स्त्रीच्या लैंगिकतेस अंकित करण्याची भूमिका पुरुषांची असते. इ. स. १९६९ पूर्वी स्वजमातीय स्त्रियांचे लैंगिक नियंत्रण, संरक्षण व परजमातीय स्त्रियांचे लैंगिक अंकन ही कार्यपद्धती जमातीय दंगलींत होती. मात्र, इ. स. १९६९ मध्ये प्रथमच हिंदू स्त्रिया दंगलीदरम्यानच्या मिरवणुकीत सहभागी झाल्या. त्यांचा हा सहभाग हिंदू पुरुषांच्या मर्दानगीला चेतना देणारा ठरला. हिंदू पुरुषांना हिंदू स्त्रियांनी प्रत्यक्ष रस्त्यावर येणे, हे स्वपुरुषत्वास आव्हान देण्यासारखे वाटले. 'आपण स्वजमातीय स्त्रियांच्या संरक्षणास कमी पडतोय काय?', असा प्रश्न हिंदू पुरुषांच्या मानसिकतेत निर्माण झाला. त्यामुळे हिंदू पुरुष अधिक आक्रमकपणे मुस्लिम वस्त्यांवर हल्ले करू लागले. त्यानंतर इ. स. १९९२-९३ मध्ये बाबरी भंजनावेळी उमा भारती यांचा प्रचार, निवडणुकीदरम्यान साध्वी ऋतुम्भरा यांची भडकाऊ भाषणे यांतून हिंदू स्त्रियांचे जमातीय राजकारण आणि हिंसेतील स्थान ठळकपणे पुढे आले. इ. स. २००२ मधील गुजरात दंगलीत हिंदू मध्यमवर्गीय स्त्रिया हिंसेत प्रत्यक्षपणे सहभागी झाल्या. हे स्त्रियांचे 'जमातीकरण' होते. पितृसत्ताकसमर्थक जमातवादाचे हे राजकीय, सामाजिक यश ठरले.

जमातवादाच्या प्रथम बळी असणाऱ्या स्त्रियांनाच जमातीय राजकारण, निवडणुकीसाठी आवश्यक जमातीय ध्रुवीकरण, जमातीय हिंसेत पुरुषांना अधिक आक्रमक करणे ह्या प्रक्रियांसाठी वापरले गेले. मुख्यतः, जातवर्ग पितृसत्ता ह्या आंतरछेदित (Intersectional) शोषणाच्या बळी असलेल्या स्त्रियांना स्वजमातीतील शोषणाचा विसर पाडला गेला आणि आभासी परधर्मीय शत्रुविरुद्ध हिंसाप्रवृत्त केले गेले. ह्या प्रक्रियेची मांडणी ह्या शोधप्रबंधात आहे.

१५. समाजवास्तव हे बहुविध घटकांनी घडत असते. त्याचा व्यापक वेध घेणे, हे सामाजिक शास्त्रांतील संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट असते. स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवाद हा बहुविध घटकांनी विकसित झाला आहे. त्याला केवळ धार्मिक अथवा राजकीय संघर्ष म्हणून अभ्यासणे अनुचित ठरेल. जमातवादाचे अंतिम ध्येय जातवर्गपितृसत्ताक व्यवस्था टिकविणे, हे आहे. हा शोधप्रबंध जमातवादी राजकारण, समाजकारण, जमातीय दंगली यांत सर्वधर्मीय उच्चजातवर्गीय अभिजनांचे हितसंबंध असल्याचे निष्कर्ष पुढे आणतो.

१६. ह्या शोधप्रबंधातील प्रकरणात स्वातंत्र्योत्तर जमातवादाच्या विकासातील विविध टप्पे मांडले आहेत. ह्या प्रत्येक टप्प्यावर जमातवादी राजकारण बदलले आहे. ह्या जमातवादी राजकारणाचा आधार असलेली जातवर्गपितृसत्ताक व्यवस्था वेळोवेळी काही बदल दर्शविते. हे बदल राजकीय, सामाजिक घटकांशी निगडीत आहे. ह्या प्रक्रियेस केवळ निवडणूक आणि तात्पुरते ध्रुवीकरण हे आधार नाहीत.. तर सर्व धर्मातील उच्चजातवर्गीय अभिजनांचे समाजव्यवस्थेवर दीर्घकालीन नियंत्रण ही अंतिम उद्दिष्ट आहे, असा निष्कर्ष ह्या शोधप्रबंधाने मांडला आहे.

संदर्भसूची :

परिशिष्ट - मुलाखती आणि छायाचित्रे :

साधने -

१. प्राथमिक साधने -

अ) मराठी साधने -

१. गोडसे गोपाळ - पंचावन्न कोटींचे बळी, द्वितीय आवृत्ती, जनआवृत्ती, ऑगस्ट, २०१३, रिया प्रकाशन, कोल्हापूर.

२. गोडसे गोपाळ - गांधी हत्या आणि मी, द्वितीय आवृत्ती, जनआवृत्ती, ऑगस्ट, २०१३, रिया प्रकाशन, कोल्हापूर.

३. गोळवलकर मा.स. - विचारधन, अनुवाद, वि. वा. तथा राजाभाऊ नेने, प्रथमावृत्ती, १३ ऑगस्ट १९६१, प्रकाशक हरी विनायक दात्ये, पुणे, मराठी संस्करण, हिंदुस्थान साहित्य, पुणे.

४. स्वातंत्र्यवीर सावरकर - स्फूटलेख, दुसरी आवृत्ती (जनआवृत्ती) ऑगस्ट, २०१३, रिया पब्लीकेशन्स, कोल्हापूर.

५. स्वातंत्र्यवीर सावरकर - हिंदुराष्ट्रदर्शन, दुसरी आवृत्ती, (जनआवृत्ती) ऑगस्ट २०१३, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.

६. पावलोव्ह व्ही. आय., रस्त्यानिकोव्ह व्ही.जी., शिरोकोव्ह जी. के. - भारत, सामाजिक, आर्थिक विकास, मराठी अनुवाद, स.ह. मोडक, प्रथमावृत्ती, १९८०, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई.

७. हुसेन मुझफ्फर - धुमसती मुंबई, प्रथमावृत्ती, जानेवारी, २००९, चंद्रकला प्रकाशन, पुणे.

८. खोपडे सुरेश - मुंबई जळाली, भिवंडी का नाही ?, प्रथमावृत्ती, ऑक्टोंबर, २०१०, स्नेह प्रकाशन, पुणे.

९. मा. न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण - मुंबई येथे डिसेंबर १९९२ व जानेवारी १९९३ मध्ये झालेल्या दंगली / हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी आयोगाचा अहवाल, खंड १, प्रथमावृत्ती.

१०. मा. न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण - मुंबई येथे डिसेंबर १९९२ व जानेवारी १९९३ मध्ये झालेल्या दंगली / हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी आयोगाचा अहवाल, खंड २, प्रथमावृत्ती.

११. हिंदु हृदयसम्राट स्वातंत्र्यवीर सावरकर - हिंदु पदपादशाही, जानेवारी, २०००, पुनर्मुद्रण, २७ डिसेंबर, २०१२, मनोरमा प्रकाशन, मुंबई, प्रकाशन.

१२. सोवनी सुनीला - लव्ह जिहाद, प्रथमावृत्ती, १९ सप्टेंबर, २०१२, पुनर्मुद्रण, मे, २०१५, भारतीय विचार साधना, पुणे.

१३. ठाकरे बाळ - हिंदुत्व सार आणि धार, पाचवी आवृत्ती, ३१ मार्च २०१४, डिम्पल पब्लिकेशन, मुंबई.

१४. जे. एन. यु. धोक्याचा लाल बावटा, प्रकाशक : डॉ. मिलिंद शेजवळ, मुंबई, प्रकाशन दिवस : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १२५ वा जयंती दिवस, १४ एप्रिल, २०१६.

१५. दलवाई हमीद - राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान, आवृत्ती दूसरी, १५ ऑगस्ट, २०१२, सुगावा प्रकाशन, पुणे.

मुलाखती -

१. तनेजा वेदप्रकाश (आर्य समाजाचे पुरोहित आणि पूर्वाश्रमीचे फाळणीतील निर्वासित) यांची मुलाखत, धुळे, ३० जानेवारी, २०१५.

२. तनेजा दुर्गादेवी (पूर्वाश्रमीच्या फाळणीतील निर्वासित) यांची मुलाखत, धुळे, ३० जानेवारी, २०१५.

३. शेख नूर बानो यांची मुलाखत, अचानक नगर, मुंब्रा, १० सप्टेंबर, २०१७.

४. शेख अनिसा यांची मुलाखत, अचानक नगर, मुंब्रा, १० सप्टेंबर, २०१७.

५. शेख नझमा यांची मुलाखत, अचानक नगर, मुंब्रा, १२ सप्टेंबर, २०१७.

६. पटेल रझिया (मुस्लिम प्रश्नावर कार्य करणाऱ्या अभ्यासक) यांची मुलाखत, पुणे, २७ नोव्हेंबर, २०१७.

७. राजन अन्वर (गांधीवादी कार्यकर्ते) यांची मुलाखत, पुणे, २९ नोव्हेंबर, २०१७.

८. शेख अन्वर (निवृत्त पोलीस निरीक्षक) यांची मुलाखत, पुणे, ३० नोव्हेंबर, २०१७.

९. कसबे रावसाहेब (जमातवादाचे अभ्यासक आणि राज्यशास्त्र विषयाचे निवृत्त प्राध्यापक) यांची मुलाखत, नाशिक, १८ जुलै, २०१९.

१०. स्नेहा गोळे (स्त्रीवादी अभ्यासक आणि प्राध्यापिका) यांची मुलाखत, पुणे, २८ जानेवारी, २०१८.

११. गावित लाझरस (ख्रिश्चनविरोधी जमातीय दंगलीचे प्रत्यक्षदर्शी) यांची मुलाखत, धुळे, १५ ऑक्टोबर, २०१९.

१२. परदेशी रणजीत (जमातवादाचे अभ्यासक, मार्क्सवादी-फुले-आंबेडकरवादी कार्यकर्ते) यांची मुलाखत, धुळे, २० जुलै, २०१९.

इंग्रजी प्रथमिक साधने -

१. Gandhi M. K. - India of My Dreams, Compiled by R.K. Prabhu, Represented in January, 1959, Navjivan Publishing House, Ahmedabad.

२. Gandhi M.K. - Political & National life and Affairs, 1967, Vol. 2, Compiled by V. B. Kher, Navjivan Publishing House, Ahmedabad

३. Prasad Rajendra - India Divided, 2010, Penguin Books, India.

४. Interview of Gopal Godse (Brother of Nathuram Godse) published in Frontline, January, 1994.

५. Dr. Ambedkar B.R.- writings & Speeches, Vol. 14 (2), Section 4, 1995, Education Department, Govt. of Maharashtra.

६. Lok Sabha Debates, Lok Sabha Secretariat, New Delhi.

७. Rajya Sabha Debates (web source).

८. Unpublished Report on Bhagalpur Riots (1989) by Dr. Suresh Khairnar (Member of All India Secular Forum and Former President of Rashtra Seva Dal).

९. Sreekumar RB - Gujarat : Behind the Curtain, 2016, Manas Publications, New Delhi,

१०. Ayub Rana - Gujarat files : 2016, 2nd Edition.

११. Rai Vibhuti Narain - Hashimpura, 22 May, (Ed. 2016) Penguin Books, India, New Delhi.

१२. Unpublished Article - 'Notes on Imperialist Globalization and Contemporary Communalism - An Unholy Synergy, Requiring A Holistic Responense' by Abhay Shulka Presented in the "Samyukta Khoj" in Nagpur on 8-4-2007.

इंग्रजी प्राथमिक साधने (वृत्तपत्रे) :-

१. The Times of India, (A. D. 1947 to A. D. 2002), Delhi and Mumbai Editions.

२. The Indian Express, Mumbai Edition, A.D.1984 to A.D. 2002.

इंग्रजी प्राथमिक साधने (नियतकालिके) :-

१. Organizer (Weekly)

ध्वनीचित्र स्वरुपातील प्राथमिक साधने (व्हिडिओ) :-

१. http://www.youtube.com/watch?v=KrqZ04ylmo (Primary source).

हिंदी प्राथमिक साधने :-

१. गोळवलकर मा. स. - विचार नवनीत, पंचम संस्करण, संवत, २०७१, ज्ञानगंगा प्रकाशन, जयपूर.

२. राय विभुती नारायण - सांप्रदायिक दंगे और भारतीय पुलिस, (पैपर बैक्स), तिसरा संस्करण, २०१६, राधाकृष्ण प्रकाशन.

३. लव्ह जिहाद : धर्मसंकट का स्वरुप एवं उपाय, हिंदू जनजागृती समिती, सनातन भारतीय संस्कृती संस्था, रायगड, महाराष्ट्र, प्रथम संस्करण : स्वा. सावरकर जयंती, कलियुग वर्ष ५११३ (२३/०५/२०११), द्वितीय पुनर्मुद्रण : सरदार उधमसिंह बलिदान दिन, कलियुग वर्ष ५११४ (३१/७/२०१२).

४. भागवत मोहनराव - संघ का आव्हान (नागपूर मे १४ अक्तूबर, २०१३ को दिया गया बौद्धिक), सुरुचि प्रकाशन, नई दिल्ली.

५. गांधी इंदिरा - चुने हुए भाषण और लेख, सितम्बर, १९७२ से मार्च, १९७७, खंड ३, निदेशक, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, नवम्बर, १९९०.

६. सिंघ जरनैल - कब कटेगी चौरासी ?, प्रथम संस्करण, २००६, पेंग्विन बुक्स, इंडिया, नई दिल्ली.

७. शाखा पुस्तिका, श्री. भारती प्रकाशन, नागपूर.

हिंदी प्राथमिक साधने (नियतकालिके) :

१. पांचजन्य (साप्ताहिक)

दुय्यम साधने (मराठी) :

१. पाटील शरद् - मार्क्सवाद : फुले-आंबेडकरवाद, प्रकाशनकाल : १५ सप्टेंबर, १९९३ सुगावा प्रकाशन, पुणे.

२. पाटील शरद् - स्वातंत्र्य लढ्याचे कर्मठ व ब्राह्मणी मार्क्सवादी विश्लेषण करणारा नंबुद्रीपादांचा ग्रंथ, सत्यशोधक मार्क्सवादी : मार्च, १९८७.

३. गरुड सचिन, परदेशी रणजीत - डॉ. आंबेडकर, सावरकर आणि वंशसंहाराचा राष्ट्रवाद, प्रथमावृत्ती, २००३, मार्क्सवाद - फुले-आंबेडकरवाद समन्वय समिती, महाराष्ट्र.

४. पळशीकर वसंत - जमातवाद (संपादन - भोळे, भा. ल.), पहिली आवृत्ती, १९९७, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

५. गुहा रामचंद्र - गांधी नंतरचा भारत : २०१२ : अनुवाद- शारदा साठे, दुसरी आवृत्ती, ऑगस्ट, २०१२, मॅजेस्टीक पब्लिकेशन्स, ठाणे.

६. पळशीकर सुहास - जमातवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही, (संपादन - विद्युत भागवत), प्रथमावृत्ती, २ जानेवारी, २००६, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, यांच्यातर्फे प्रकाशित.

७. चंद्र बिपन, मुखर्जी आदित्य - इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स, मराठी अनुवाद (अनुवाद - मा. कृ. पारधी, प्रा. व्ही. सी. फडके, डॉ. अरुण जोशी, प्रा. एस. बी. नातू, व्ही. एस. क्षिरसागर), सहावी आवृत्ती, २०१३, 'के' सागर पब्लिकेशन, पुणे.

८. भोळे भा. ल. - भारतीय राज्यव्यवस्था, पाचवी आवृत्ती, जुन, २०११, पिंपळापुरे आणि कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

९. महाले, कु. ल., मनुचा मासा, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मयगृह, मुंबई.

१०. भोळे भा. ल. - भारतीय राज्यव्यवस्था, पाचवी आवृत्ती, जून २०११, पिंपळापुरे आणि पब्लिशर्स, नागपूर.

११. वंशसंहाराचे राजकारण, दुसरी आवृत्ती, ६ डिसेंबर, २००६, मा. फु. आ. को. ओर्डीनेशन कमिटी.

१२. परदेशी रणजीत - जातीव्यवस्था, जमातवाद आणि मुस्लीम समाज, दुसरी आवृत्ती, फेब्रुवारी, २००१, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी.

१३. पळशीकर सुहास - देश-प्रदेश : प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा, लेख : 'पंजाब : धार्मिक अस्मिता आणि हिंसा यांच्या काचात्यातील राजकारण', दुसरी आवृत्ती, फेब्रु. २०१५, द युनिक अकादमी प्रकाशन, पुणे.

१४. पळशीकर सुहास - देश-प्रदेशः प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशाः, लेख पंजाब धार्मिक अस्मिता आणि हिंसा यांच्या काचाट्यातील राजकारण दुसरी आवृत्ती, फेब्रुवारी, २०१५, द युनिक अकादमी प्रकाशन, पुणे.

१५. शिराळकर कुमार - कशात दडली आहेत आसाम समस्येची मुळे? परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ ऑक्टोबर, २०१२.

१६. कुलकर्णी मुक्ता - ईशान्य भारतः वंशसांस्कृतिकता आणि राजकारण : परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ ऑक्टोबर, २०१२.

१७. मोघे किरण, मुळे अंजली, कुलकर्णी विद्या - गुजरातः सत्य आणि फक्त सत्यच (माहिती संकलन, भाषांतर आणि संपादन), प्रथम आवृत्ती एप्रिल, २००२, आगरकर विचार व्यासपीठ, मुंबई.

१८. कक्कर सुधीर - मन-अरण्याच्या शोधात, मुलाखत-अतुल देऊळगावकर, साधना. १० नोव्हेंबर ते १ डिसेंबर, २०१८.

दुय्यम साधने (इंग्रजी) :

1. A Dictionary of the Socil Sciences Editors-Julias Gould. William L. Kolb: Complied under the Auspices of the United Nations Educational, Scientific and Cultural Organization, Tavistok Publications, 1st Edition: 1964, London.
2. Dictionary of Social Science: Ed. by Caring Calhoun: Oxford University, Press, 2002, New York.
3. Brass Paul - the politics of India since Independence, Cambridge University Press, 2004, New York.
4. Brass Paul - Language, Religion and Politics in North India, Vikas Publishing House, 1975, Delhi,.

5. Brass Paul - Development of Institutionalized Riots System in Meerut City, October, 30, 2004, EPW.
6. Kothari Rajni - The Meaning of Jawaharlal Nehru, Economic Weekly, Special Number, July 1964.
7. Kothari Rajni - Politics and the People (Vol. 1) Ajanta Publication, (Second Ed.) 1990, New Delhi.
8. Kothari Rajni - Politics and the People, Vol, 2, (First Ed.) 1990, Aspect Publications, New Delhi.
9. Berenshot Ward - Riot Politics, (First Ed.) 2011, Rupa Publishers, New Delhi.
10. Communal Riots in Post-Independence India, Ed. Asghar Ali Engineer, 2nd Edition, 1997, Sangam Books, Hyderabad,.
11. Chakravati Uma - Conceptualising Brahmanical Patrirchy in Early India-Gender, Caste, Class and State, Economic and Political Weekly, April 3, 1993.
12. Brass Paul - Development of Institutionalized Riots System in Meerut city, EPW, October, 30, 2004.
13. Kothari Rajni - The Meaning of Jawaharlal Nehru, July 1964, Economic Weekly, Special Number.
14. Kothari Rajni - Politics and The People (Vol.1), Second Edition 1990, Ajanta Publications, New Delhi.
15. Ali Asghar - 'Nehru, Jinnah and Partition' : Secular Perspective : August 16-31, 2009.
16. Ali Asghar - Muslim and Mainstream, Ajanta Publishers, 1999.
17. Ali Asghar - Kota : Another Case of Planned Violence, EPW. December 9, 1989.
18. Kokar Sudhir - The Colours of Violence, 1st Penguin Books Edition, 1996, Penguin Books, India, 1996 .
19. Ram P. R. (Edited) - Secular Challenge to Communal Politics, 1st Edition, 1998, Vikas Adhyayan Kendra, Mumbai.
20. Berenschot Ward - Riot Politics, Originally Published in Great Britain, 2011, Published in RAINLIGHT by Rupa Publication, New Delhi.

21. Mohammad Sajjad - Muslim Politics in Bihar: Changing Contours, 2014, Routledge Publishers, New Delhi.
22. Article by Tarique Anwar, 28 February, 2018, Newsclick, (https://www.newsclick.in/indicted-his-role-bhagalpur-riots-s-dwivedi-over-new-bihar-dgp)
23. Guha Ramchandra - India After Gandhi, 1st Edition, 2007, Picador India.
24. Article - 'Recent History and Politics of Communalism and Communal Riots in Gujarat' by Priyavadan Patel, from Book 'Communalism in India', Ed. by Asghar Ali Engineer, Moin Shakir, Ajanta Publications, Delhi, 1st Edition 1985.
25. Article- 'The 1969 Communal Riots in Ahmedabada Case Study' by Ghanshyam Shah from Book Communal Riots in Independent India, Edited by Asghar Ali Engineer, 2nd Edition, Sangam Books, Hyderabad, Reprinted in 1997.
26. Jaffrelot Chrostophe - Religion, Caste and Politids in India. (1st Edition Reprinted) 2001, Primus Books, New Delhi.
27. Singh Pav - 1984 : India's Guilty Secret, 1st Edition: 2017, New Dehli.
28. Economic and Political Weekly: 'Urban Denotified Tribes : Competing Identities, Contested Citizenship': by Meena Radhakrishna: Vol. 42, Issue No. 51 December 22, 2007.
29. Economic and Political Weekly: Communal Riots and Jamshedpur': by Kashif ul Huda: Vol 44, Issue no, 21: 23rd May, 2009.
30. Aggarwal J.C. and Chowdhary N.K. - Ramjanmabhoomi Through The Ages S. Chand and Company ltd., 1st Edition, 1991, New Delhi.
31. Sarkar Tanika - The Women As Communal Subject, Economic and Political Weekly, 31 August, 1991 (Article).
32. Article by Tarique Anwar, 28 February, 2018, Newsclick (https://www.newsclick.in/indicted-his-role-bhagalpur-riots-s-dwivedi-over-new-bihar-dgp)
33. https://www.indiatoday.in/fyi/story/hashimpura-massacre-a-timelaine-1379612-2018-10-31

34. Ansari Iqbal - Hashimpura Killings; is there any hope of Justice Economic and Political Weekly, 30 December, 2000 (Article)
35. Shani Ornit - Communalism, Caste and Hindu Nationalism, 2008, Reprinted 2017, Combridge University Press, 1st South Asian Edition, Delhi.
36. Puniyani Ram - Caste and Communalism, 1st Edition, 2011, Mythri Books, Thirianntpuram.
37. Kothari Rajni - Culture of Communalism in Gujarat : Economic and Political Weekly, November 30, 2002.
38. Dutta, Nonika: Gujarat and Majority Women : The Hindu, 15 June, 2002, https://www.thehindu.com/2002/06/15/stories/2002061501511000.htm
39. Lobo, Lancy, Adivasis, Hindutwa and Post Godhra Riots in Gujarat, E.P.W., November, 2002.
40. E.P.W. Editorial, 29 January, 2011, Vol. xLVI, no. 5.
41. Article by Maanvi- https://www.thequint.com/explainers/why-india-shouldn-forget-graham-staines-dara-singh-bajarangs-dal-christanity-odisha-saido

हिंदी दुय्यम साधने :-

1. रावत हरिकृष्ण - समाजशास्त्र विश्वकोश, 2009, रावत पब्लिशर्स, पुनर्मुद्रण, जयपूर.
2. कोठारी रजनी - भारत मे राजनीती, अनुवाद-अशोक जी., मार्च, 2013, ओरीएंट ब्लाकस्वान, दुसरा संस्करण, नई दिल्ली.

संशोधक

परदेशी इनायत रणजीत

मार्गदर्शक

डॉ. उमेश बगाडे
प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.